आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १७ मार्च २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी · दैनिक

वर्ष - ०२ · अंक -१९८

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 17 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-198 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




# पंतप्रधान मोदींना मिळणार शांततेचा नोबेल पुरस्कार ?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रशिया-युक्रेन युद्ध तब्बल वर्षभरापासून सुरु आहे. या युद्धाचे पडसाद संपूर्ण जगभरात उमटत असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच भारत मात्र हे युद्ध थांबवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. युरोपमधील रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याच्या भारताच्या प्रयत्नाचे नोबेल पारितोषिक समितीने कौतुक केलं आहे. नोबेल समितीचे उपनेते अॅस्ले टोजे यांनी भारताचं भरभरुन कौतुक केलं आहे. तसेच, त्यांनी मोदींच्या पाठीवर कौतुकाची थापही दिली आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धासंदर्भात ज्या पद्धतीने रशियाच्या राष्ट्राध्यक्षांना समजावून सांगितले ते कौतुकास्पद आहे. त्यांनी कोणतीही धमकी न देता आण्विक युद्धाच्या परिणामांबद्दल कठोर संदेश दिला, आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्याला अशाच नेत्यांची गरज आहे, असं म्हणत नोबेल समितीचे उपनेते अॅस्ले तोजे यांनी मोदींचे कौतुक केले आहे.

पंतप्रधान मोदींचे कौतुक करताना नोबेल समितीचे नेते अॅस्ले टोजे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी नोबेल शांतता पुरस्काराचे प्रबळ दावेदार असू शकतात. पंतप्रधान मोदी हे अत्यंत विश्वासू नेते आहेत, ते शांतता प्रस्थापित करु शकतात. तसेच, पंतप्रधान मोदी हे जगातील मोठ्या राजकारण्यांपैकी एक आहेत आणि ते शांततेसाठी मोठे योगदान देत आहेत.

टोजे म्हणाले की, मला आनंद आहे की, मोदी केवळ भारताला पुढे नेण्याचं काम करत नाहीत. तर जगातील शांततेसाठी महत्त्वाच्या मुद्द्यांवरही काम करत आहेत. जगाने भारताकडून शिकण्याची गरज आहे. भारत महासत्ता होणार हे निश्चित आहे.

# 'अवकाळी'मुळे दाणादाण

## आंबा, द्राक्ष, गहू, हरभरा, हळद, केळी पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्रातील बहुतांश भागात बुधवारी रात्रीपासून अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. गुरुवारी मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात व पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात गारपीट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या आंबा, द्राक्ष, गहू, हरभरा, हळद, केळी आदी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.**

साताऱ्याला गुरुवारी पुन्हा अवकाळी पावसाने दणका दिला. ढगांच्या गडगडाटात विजांच्या कडकडाटात गरपीठिसह झालेल्या मुसळधार पावसाने गहू, ज्वारी, स्ट्रॉबेरी भाजीपाला आदी पिकांचे मोठे नुकसान झाले. पाचगणी वाईत गारांचा मोठा पाऊस झाला. तलाठ्यांच्या संपाने शेतीच्या नुकसानीचे पंचनामे लांबले आहेत. पाचगणी येथील दोन म्हशी वीज पडून ठार झाल्या. साताऱ्यात वाई पाचगणीसह अनेक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. सकाळपासूनच आकाशात अवकाळी पावसाच्या ढगांची मळभ दाटली होती. अखेरीस संध्याकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. दिवसभर ढगाळ वातावरण आणि संध्याकाळी अवकाळी पावसामुळे सातारकरांना ऐन ऊन्हाळ्यात पावसाळ्याची अनुभूती मिळाली. या पावसाने सर्वत्र पावसाळी वातावरण तयार झाले असून वातावरणात मोठा गारवा पसरला आहे. पाचगणी, वाई, जावली परिसरात गारांचा पाऊस झाला त्यावेळेस स्ट्रॉबेरी पिकाचेही मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची त्रेता तिरपीट उडाली. पुढील ३-४ दिवस पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये गडगडाटासह गारपीठ आणि वादळी वारे विजांच्या कडकडाटासह वाहतील. तसेच या भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने शेतकरी चिंतेत आहेत.



नांदेड-भोकर रस्त्यावरील बारड येथे महामार्ग पोलीस सुरक्षा पथकाच्या चौकीवरील पत्रे तुफान वादळाने उडून गेली . त्यानंतर झालेल्या गारपिटीने चौकीत गारांचा थर साचला होता .

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली . या वादळी वाऱ्यामुळे व गारपिटीमुळे गहू, हरभरा, हळद, केळी पिकांचे नुकसान झाले . बारड, डोंगरगाव, शेंबोली, खांबाळा, ईजळी, सीता बोरगाव आदी गावांत प्रमाणात गारपिटीसह पाऊस झाला . देऊबाई भालेराव व गणेश भालेराव ( रा . बोरगाव सीता ) या दोघाशेजारी वीज पडल्याने ते किरकोळ जखमी झाले . पुढील उपचारासाठी त्यांना बारड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहे . पंढरी वडेपल्ली ( रा . शेंबोली ) हे सुद्धा जोरदार वाऱ्यामुळे घरावरील पत्रे उडून पत्राचा मार लागून जखमी झाले . रोही पिंपळगाव ( शंकरनगर ) येथील शेतकरी दत्ता बालाजी कोकणे ( वय 35 ) हे शेताकडे जात असताना जोरदार वारा सुटल्यामुळे त्यांच्या पाठीवर झाड पडल्याने कमरेला जबर मार लागला असून त्यांवर सिद्धिविनायक हॉस्पिटल मुदखेड येथे उपचार सुरु आहेत .

# अंबाबाई मंदिरात पत्रकारांना कॅमेराबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथील करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात वार्तांकनासाठी गेलेल्या पत्रकारांना कॅमेरा घेऊन बंदी करण्यात आली आहे. गुरुवारी अंबाबाई मंदिराच्या प्रवेशद्वारावरच माध्यमांना अडवण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी तसा आदेश काढल्याचे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने म्हटले आहे. गेल्या काही दिवसांपासून श्री अंबाबाईच्या मूर्तीचा मुद्दा समोर आला आहे. यावरुन कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात याचिकाही दाखल झाली आहे. दरम्यान, अंबाबाईच्या मूर्तीची स्थिती नाजूक असल्याचे कोल्हापूरच्या माध्यमांनी समोर आणले होते. यानंतर पहिल्यांदा राज्य पुरातत्त्व आणि नंतर केंद्रीय पुरातत्त्वकडून पाहणी करण्यात आली आहे. मात्र, टीआरपीसाठी बातम्या दाखवल्या जात असल्याचा आरोप जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, केंद्रीय पुरातत्त्वकडून पाहणी करताना मूर्तीशी छेडछाड झाल्याचा आरोप श्रीपूजकांच्या वकिलांनी केला आहे.

मंगळवारी केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून पाहणी करण्यात आली. मात्र, विभागाने पाहणी करताना श्री अंबाबाईच्या मूर्तीशी छेडछाड झाल्याचा आरोप श्री पूजकांच्या वकिलांनी केला आहे. लेपचा काही थर काढून टाकल्यानंतर मूर्तीचा चेहरा आणखी खराब झाल्याचे म्हटले आहे. या संदर्भात देवीच्या मूर्तीची दोन छायाचित्रे कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात सादर करण्यात आली आहेत.

**लेपचा काही थर काढून टाकला :** श्रीपूजक गजानन मुनीश्वर यांनी मूर्ती संवर्धन प्रक्रियेबाबत कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात याचिका दाखल केली आहे . या याचिकेवर आज सुनावणी झाली . यावेळी श्रीपूजकांच्या वकिलांनी केंद्रीय पुरातत्त्व विभागाने छेडछाड केल्याचा गंभीर आरोप केला . कोणत्याही परवानगीशिवाय चेहऱ्यावर यापूर्वी लावलेला लेपचा काही थर काढून टाकला . लेपचा काही थर काढून टाकल्यानंतर मूर्तीचा चेहरा आणखी खराब झाल्याचे समोर आले आहे . त्यामुळे केंद्रीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर कृत्य केल्याचा दावा श्री पूजकांच्या वकिलांनी केला आहे .

**सद्यस्थितीत मूर्ती सुरक्षित :** केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अधिकारी राजेश्वरी, शिवन्नाकुमार, राम निगम, उत्तम कांबळे यांनी मंदिरात मूर्तीची मंगळवारी पाहणी केली होती . या संदर्भातील केंद्रीय पुरातत्त्व विभाग लवकरच अहवाल सादर करणार आहे, या अहवालानंतर संवर्धनासंदर्भात पुढील निर्णय होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी दिली आहे . सद्यस्थितीत मूर्ती सुरक्षित असून काही प्रमाणात संवर्धनाची गरज भासल्यास त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिल्या जातील, अशी माहिती केंद्रीय पुरातत्त्व विभागाने दिल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे .

# वाळू चोरट्यांनी चंद्रभागेत पाडलेले खड्डे रंगवले!

## समाजसेवक गणेश अंकुशराव यांचे एक हटके आंदोलन


आधुनिक केसरी न्यूज

पंढरपूर : चंद्रभागेच्या पात्रातील वाळुचोरीच्या विरुध्द यल्गार करणारे पंढरीतील समाजसेवक, महर्षी वाल्मिकी संघाचे गणेश अंकुशराव यांनी आज वाळु चोरीच्या विरुध्द आणखी एक हटके आंदोलन केले. रंगपंचमीनिमित्त त्यांनी चक्क वाळु चोरट्यांनी वाळु नेऊन पडलेल्या खड्ड्यांमध्ये विविध रंग टाकून अनोखी रंगपंचमी साजरी केली.

गेल्या अनेक वर्षांपासुन अधिकृत वाळुचा लिलाव बंद असुनही चंद्रभागेच्या पात्रातुन सर्रासपणे वाळु चोरी होताना आढळुन येत आहे. यामुळे चंद्रभागेच्या पात्रात ठिकठिकाणी अनेक मोठमोठे खड्डे पडलेत. या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने चंद्रभागेचे पवित्र स्नान करताना अनेक भाविकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. याविरुध्द समाजसेवक गणेश अंकुशराव हे सातत्याने विविध आंदोलनं करुन शासनाचे व प्रशासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु अद्यापही शासन याकडे गांभीर्याने पहात नसून प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने बिनदिक्कत वाळु उपसा सुरुच आहे.

गणेश अंकुशराव यांनी मात्र आपला वाळु चोरीच्या विरोधातील लढा सुरुच ठेवला असुन जोपर्यंत येथील वाळुचोरी संपुर्णपणे थांबत नाही तोपर्यंत याविरुध्द आवाज उठवणारंच असा निर्धार करत, त्यांनी आज वरीलप्रमाणे चंद्रभागेच्या पात्रात अनोखी रंगपंचमी साजरी केली. आज रंगपंचमी खेळली उद्या बेजबाबदार प्रशासकीय अधिकार्यांच्या कार्यालयात जाऊन आमच्या स्टाईलने परंतु लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करावे लागेल. असा इशारा यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला. यावेळी गणेश अंकुशराव, सुनील कोताळकर, शंकर अभंगराव, सोमनाथ कोरे, तुकाराम अंकुशराव, नंदु नेहतराव, बापु करकमकर, दत्ता सगर, सचिन अधटराव, अक्षय करकमकर, सोपान अंकुशराव, पिंटू करकमकर, हर्षद अभंगराव आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण त्यासाठी तुम्हाला हातपाय हलवावे लागतील रे....' 'तू बघतोस ना की शाळांमधून दिवसेंदिवस मराठी भाषा हद्दपार होताना दिसते आहे. आवश्यक भाषा म्हणून काही शाळा नाईलाजाने शिकवतात ती ! मराठी माध्यमातून शिकणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. हिंदी, इंग्रजी या भाषांबद्दल माझ्या मनात आकस नाही रे. पण लहानपणी मुलांना वाढीसाठी आईचंच दूध चांगलं असतं नाही का ? लहानपणी मुलाला आईचं दूध मिळालं तर त्याचा शारीरिक, बौद्धिक विकास निकोप होतो....'

' साहित्य संमेलनात माझ्या वाढीसाठी खूप काही प्रयत्न होतील अशी मनात आशा ठेवून मी आले होते. तशी माझी अगदीच निराशा झाली नाही. पण कसं होतं ना, घरात मुलाचं लग्न झालं, सून आली की आईची तशी उपेक्षाच होते. तिला आई आई म्हणून म्हटलं जातं . पण घरात होणाऱ्या निर्णयात तिचा फारसा विचार घेतला जात नाही. तसंच काहीसं झालं आहे...'' माझी एक खंत आहे, सांगू का ?'' हो, सांग ना...! मलाही जाणून घ्यायचं आहे. ' ही दरवर्षी जी साहित्य संमेलनं घेतली जातात ना, ती चांगलीच गोष्ट आहे. पण माझा जो वाचक आहे, साहित्याचा आस्वाद घेणारा रसिक आहे त्याचा विचार कोणी करतं का ? मंडळाचे पदाधिकारी आणि राजकीय नेते जसं ठरवतील तसंच संमेलनाचं स्वरूप असतं. सामान्य माणसांचा विचार कुठे असतो त्यात ? मला राजकीय नेत्यांचं वावडं नाही. त्यांनी साहित्य संमेलनात जरूर यावं. पण केवळ एक रसिक म्हणून. व्यासपीठावर सारस्वतांचीच मांदियाळी असावी. संमेलनाची दशा, दिशा त्यांनीच ठरवावी. तुम्ही सगळ्या रसिक वाचकांनी ठरवलंत तर राजकीय नेत्यांची आर्थिक मदत घेण्याची गरज पडणार नाही. मला ते आवडतही नाही. कारण मग मूळ मुद्दे बाजूला राहतात. किरकोळ कारणांवरून हेवेदावे, धुसफूस होते.



## आनंदी पहाट

### भीतीयुक्त आदर काय उपयोगाचा...?

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जगाच्या पाठीवर कोणत्याही प्रांतात आपण गेलो तर, आपल्याला नव्यानं भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नमस्कार करण्याची पारंपारिक प्रथा सर्वत्र आहे. अर्थात, प्रत्येक प्रांतात नमस्काराची पद्धत निराळी असते; परंतू हेतू मात्र बहुतांशी सारखाच आणि एकच असतो, तो म्हणजे आपल्या अंतर्मनातील आदरभाव व्यक्त करणं होय. ज्याठिकाणी आपण आदर व्यक्त करतो त्याचठिकाणी आपण नमस्कार करतो, काहीवेळा तर नतमस्तक देखील होतो. जेव्हा आदर दिला जातो, तेव्हाच तो आपल्याला मिळायलाही लागतो, हे आपण अनुभवत असतो. आपल्या प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते, जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. म्हणूनच आपल्या नमस्काराच्या क्रियेला नमस्काराचीच प्रतिक्रिया मिळते. ह्या नमस्काराची सुरुवात आपल्या घरापासूनच होत असते. मातृ-पितृ-आचार्य देव भवं म्हणताना आपल्या संस्कारक्षम मनाला आई-वडील-गुरु ह्याच्यापुढे नतमस्तक होण्याची सवय जडलेली असते. तेव्हापासून नमस्काराचा चमत्कार आपण अनुभवत आलेले असतो. वडिलधाऱ्या व्यक्तींना नमस्कार करणं हा आदराचा भाग झाला, परंतू तो नमस्कार जेव्हा भीतीयुक्त असतो, तेव्हा मात्र त्यांतून नेमकं काय साध्य होत असतं, हेच उमगत नाही. काहीवेळा एखाद्या व्यक्तीला अव्हेरून, टाळून चालत नाही; पर्याय नाही म्हणून देखील नमस्कार करावा लागत असतो. तर काहीवेळा, तो भीतीपोटी देखील करावा लागतो. खरं तर, भीतीयुक्त आदर आणि त्यासाठी केला जाणारा नमस्कार, जी व्यक्ती तो करून घेते त्या व्यक्तीला देखील का बरं तो इतका प्रतिष्ठेचा, महत्वाचा, मोलाचा वाटत असतो ? त्याची त्यांना काही जाणीवच होत नसते का ? कि केवळ स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी आणि मोठेपणासाठी तो करून घेतला जात असतो. काही घरांमध्ये अजूनही आणि आजही वडिलकीच्या पिढीमध्ये भीतीयुक्त आदर जपल्याचं दिसून येतं.



आधुनिक केसरी

आता न उरला | भेद मनी ||
शुद्ध भाव जोडी | सात्विकांचा संग ||
चैतन्य तरंग | आनंदाचे ||१||
स्वधर्माची घडो | पारायणे नित्य ||
सत्कर्माचे सत्य | वर्म जाण ||२||
नाशाचे कारण | मूळ एक आशा ||
सोड अभिलाषा | संसाराची ||३||
करूनिया कर्म | अर्पावे श्रीरंगा ||
गावे अंतरंगा | मनोभावे ||४||
आप-पर भाव | एकरूप झाला ||
भेद न उरला | आता मनी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

॥सम्पदाऽयाति शाश्वती॥
रचना: © चंद्रहासशास्त्री सोनपेठकर
स्वच्छशुद्धपवित्राणां
नार्थः समो हि भावयेत्।
उत्तमोत्तमसोपानं
मत्वा व्यवहरेत् तथा॥1॥

स्वच्छ, शुद्ध आणि पवित्र यांच्या समान अर्थाची कल्पना करू नये. या चढत्या क्रमाने उत्तमोत्तम पाय-या आहेत; असे समजून व्यवहार करावा.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

तप्त लोह के पिण्ड सम, भोग सकल जग जान । मुख बाये मुख जरहिंगे, कष्ट विविध अज्ञान ।।५८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल चतुर्थ अध्याय) ०२/०४/५८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

तप्त लोखंडासमान संसारातील समस्त विषय भोग आहेत. त्यांना भोगण्यासाठी जेव्हा तोंड उघडले जाईल तेव्हा ते जळून दग्ध होऊन जाईल. जीव अज्ञानाने या विषय-भोग-रूपी अग्नीत जळून विविध प्रकारच्या दुःखांना प्राप्त करीत आहे. जीवनात भोगाची इच्छाच पतन आणि अत्यंत दुःखाचं कारण आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## ग्रंथ कसा असावा

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जेव्हा आपण सर्व बाजूने विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की ग्रंथ हा परमार्थात होडी प्रमाणे उपयोगात येतो. नाव जशी आपल्याला पैल तीराला नेऊन सोडते त्याप्रमाणे ग्रंथ आपल्याला पैलतीरावर नेऊन सोडतात. अद्वैता सारखा ग्रंथ नाही परमार्थ मार्गाचा अभ्यास करत असताना प्रापंचीक विषया वरील ग्रंथ उपयोगाचे नाहीत. ते चांगले आहेत हास्यविनोद अशा नवरसाने भरलेले आहेत पण साधकाला अशा ग्रंथात मार्गदर्शन होत नाही. जो ग्रंथ वाचला असता साधकाचा परमार्थ वाढतो त्याच्या अंगी अनुताप उत्पन्न होउऊन मन शुध्द होते,त्याला भक्तिची साधना मनापासून करावी वाटते तोच ख-या अर्थाने ग्रंथ होय. जो एकला असता माणसाचा अभिमान नाहिंसा होतो. त्याचा भ्रम होतो मनाला उभारी येते. भगवंताकडे मन ओढ घेऊ लागते.

## भक्त आणि परमात्मा एकरूपच असतात

आधुनिक केसरी

आमच्या हातून वारंवार चुका होतात' असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आईबापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले की, 'तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस' तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान्, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल. एखादा मुलगा 'मी विहिरीत उडी घेणार' म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा



तोंडात मारून तिथून बाजूला काढायचे ? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधिग्रस्त असेना ! अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते, त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला 'मी' चा विसर पडत जातो. 'मी नसून तूच आहेस' ही भावना दृढ होत जाते. शेवटी 'मी' नाहीसा झाला की राम, कृष्ण, वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो. आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे की, 'भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.' यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही.

**आजचे बोधवचन आहे -**
**परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे.**
**श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥
तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥
न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ॥२॥
तुका म्हणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥३॥
बाईल सवासिण आई । आपण पितरांचे ठायीं ॥१॥
थोर वेच जाला नष्टा । अवघ्या अपसव्य चेष्टा ॥ध्रु.॥
विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ॥२॥
तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥३॥
दानें कांपे हात । नाव तेविशीं मात ॥१॥
कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ध्रु.॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
adhunikkesari.com Adhunik Kesari








# पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशांचे हाल

## महत्वाच्या प्लाटफॉर्मवर जाणीवपूर्वक उभ्या केल्या जातात मालगाड्या

आधुनिक केसरी न्यूज




**पुर्णा :** मराठवाड्यातील सर्वात महत्वाचे व सर्वात मोठे रेल्वे जंक्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुर्णा रेल्वे स्थानकावरून चोवीस तासाच्या कालावधीत तब्बल चाळीस प्रवासी साप्ताहीक/विशेष एक्सप्रेस/पेसेंजर रेल्वे गाड्या धावतात तर मालवाहतुक करणाऱ्या अंदाजे पंचवीस ते तिस गाड्या धावतात. परंतु गाड्यांचे नियोजन योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे प्रवासी वर्गात प्रचंड गोंधळ माजतांना दिसत असून ज्या महत्वाच्या रेल्वे प्लाटफॉर्मवर प्रवासी रेल्वे गाड्या थांबवायला हव्यात त्या प्लाटफॉर्मवर जाणीवपूर्वक मालवाहतूक करणाऱ्या गाड्या उभ्या केल्या जात असल्यामुळे महिला/अबालवृध्द/अपंग प्रवासी वर्गाची अक्षरशः धावपळ होत असून प्लाटफाम बदलतांना धावपळीत महिला अबालवृध्द तसेच अपंग प्रवास्यांना जीव धोक्यात घालावा लागत आहे. पुर्णा रेल्वे स्थानकाच्या नियोजनाची सर्वस्वी जवाबदारी असलेले स्टेशन मास्टर शेख अख्तर पाशा यांच्या नियोजनशुन्य कारभाराचा फटका प्रवासी वर्गाला सातत्याने सहन करावा लागत आहे येथील रेल्वे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे रेल्वे प्रवाश्यांची सातत्याने गैरसोय केली जात असल्याचे दिसून येत आहे रेल्वेच्या महत्वाच्या रेल्वे प्लाटफॉर्मवर मालवाहतूक करणाऱ्या गाड्या तासनतास उभ्या करण्यात येत असून प्रवासी गाड्यांना प्लाटफॉर्मवर जागा उपलब्ध नसल्यामुळे या प्रवासी गाड्याना रेल्वे प्लॅटफॉर्मच्या बाहेरच उभे करून ठेवण्यात येत असल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे दिसत असून अशीच घटना मंगळवार दि.१४ मार्च २०२३ रोजी दुपारी ०३:३० वाजता घडली असून प्लॅटफॉर्म नंबर ०१ वरची गाडी प्लॅटफॉर्म नंबर ०४ वर तर प्लॉट नंबर ०४ ची गाडी प्लॅटफॉर्म नंबर ०१ वर घेण्यात आली. यामुळे प्रवाशांना या रेल्वे स्थानकावरून त्या स्थानकावर धावपळ करावी लागली त्यामुळे प्रवासी प्लॅटफॉर्म स्थानकावर न बसता रेल्वे पादचारी पुलावर तासनतास उभे राहिल्याचे निदर्शनास आले. यावेळी अबालवृद्ध/महिला अपंग प्रवाश्यांना जीव मुठीत घेऊन रेल्वे प्रवास करावा लागत आहे या प्रवाशांना रेल्वे प्रशासन जाणीवपूर्वक त्रास देण्याचे काम करत आहे की काय ? असा गंभीर प्रश्न प्रवाशांतून उपस्थित होत आहे.या सर्व गंभीर प्रकाराला सर्वस्वी स्टेशन मास्टर शेख अख्तर शेख पाशाच जवाबदार असल्यामुळे रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# फुकट्या रेल्वे प्रवाशांकडून १७ लाखांचा दंड वसूल

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांविरुद्ध रेल्वेच्या वाणिज्य विभागाने धडक मोहीम सुरू करून धावत्या ७० रेल्वे गाड्यांमधून सुमारे १७.३० लाख रुपयांची दंडात्मक वसुली केली. या कारवाईने फुकट्या प्रवाशांचे धाबे दणाणले. प्रामुख्याने गर्दीची रेल्वे स्थानके मनमाड, नाशिक, भुसावळ, खंडवा, अकोला, बडनेरा या रेल्वे स्थानकांवरही तिकीट तपासणी करण्यात आली.

भुसावळ-खंडवा-इगतपुरी, अमरावती-भुसावळ-चाळीसगाव-धुळे या मार्गावरही कारवाईचा धडाका सुरू आहे. मंडळ रेल्वे प्रबंधक एस. एस. केडिया यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य मंडळ वाणिज्य प्रबंधक शिवराज मानसपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभाग रेल्वे सुरक्षा दलातर्फे या भागात एक दिवसीय तिकीट निरीक्षण अभियान राबविण्यात आले. वाणिज्य अधिकारी आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या संयुक्त पथकाने ७० धावत्या रेल्वे गाड्यांवर लक्ष केंद्रित केले. या पथकात तीन अधिकारी, तिकीट निरीक्षक, वाणिज्य आणि व्यावसायिक अधिकारी वर्ग, रेल्वे सुरक्षा दलाचे जवान अशा ४२ जणांच्या पथकाने ३०२२ प्रकरणात १७.३० लाख रुपयांचा महसूल रेल्वेला मिळवून दिला.






# अंबड येथे उद्या स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे आठवे पुष्प

## 'आजचा युवक आणि नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर मत्स्योदरी महाविद्यालयात प्रा. डॉ. कन्नुलाल विटोरे यांचे व्याख्यान तसेच योगेश गायके यांचे देशभक्तीपर गीतगायन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी)यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू



असलेल्या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प अंबड येथील मॉडेल कॉलेज, घनसावंगीचे प्रा. डॉ. कन्नुलाल विटोरे हे 'आजचा युवक आणि नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर गुंफणार आहेत. तसेच सुप्रसिद्ध गायक योगेश गायके यांचे देशभक्तीपर गीतगायन यावेळी होणार आहे. शनिवार, दि. 18 मार्च रोजी





सकाळी 11.30 वाजता मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शहाजीराव गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थितीचे आवाहन संयोजक डॉ. राम रौनेकर (प्रमुख, मराठी विभाग), डॉ. सुषमा प्रधान, प्रा. दीपक राखुंडे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.

## प्रदूषणाची भयावहता

आधुनिक केसरी

भारतातील प्रदूषणाची भयावहता स्वित्झर्लंडच्या ‘आयक्यूएअर’ संस्थेने जाहीर केलेल्या अहवालातून समोर आली आहे. वर्ष २०२२मध्ये मध्य व दक्षिण आशियातील १५ सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १२ शहरे भारतातील असल्याची आकडेवारी या संस्थेने सादर केली आहे. राजस्थानातील भिवाडी शहर भारतातील सर्वाधिक प्रदूषित ठरले आहे. भारताची सरासरी पीएम २.५ पातळी ५३.३ ग्रॅम प्रति क्युबिक मीटर असून, वर्ष २०२१च्या ५८.१च्या तुलनेत ती किंचित कमी झाली आहे. गेल्या वर्षी भिवाडी शहरातील प्रदूषणाची पातळी (पीएम२.५) ९२.७ ग्रॅम प्रति क्युबिक मीटर होती. देशातील जवळपास ६० टक्के शहरांतील प्रदूषण जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या पीएम२.५च्या मार्गदर्शक पातळीहून सातपट अधिक होते. देशातील प्रदूषणात वाहतूक क्षेत्राचा वाटा मोठा असून, शहरांतील प्रदूषणाचे ते प्रमुख कारण आहे. सर्व भारतीय शहरांमध्ये वाहतूक क्षेत्रामुळे पीएम२.५ पातळीमध्ये २० ते ३५ टक्के एवढी वाढ होते. शेतातील कापणीनंतर राहिलेले खुंट जाळण्याच्या प्रकारामुळेही अनेक शहरांवर काळे ढग दाटून येत आहेत. मात्र त्याचा परिणाम दिल्लीसह केवळ काही भागांपुरता मर्यादित आहे. वीजटंचाईमुळे सन २०२२मध्ये केंद्र सरकारने कोळसा खाणींसाठीचे नियम शिथिल केल्याचाही परिणाम प्रदूषणवाढीवर झाला आहे.

कोळसा खाणींमधून वाढीव कोळसा उत्खनन करण्यास मान्यता मिळाल्याने या क्षेत्रांमध्ये उष्णतेची तीव्र लाट दिसून आली. नोव्हेंबर, २०२२मध्ये कोळसा आयात त्यापूर्वीच्या दहा महिन्यांतील सर्वांत कमी नोंदवली गेली व कोळसा उत्पादनात ११.७ टक्के वाढ होऊन ते ७ कोटी ५९ लाख टनांवर पोहोचले. गेल्या काही वर्षांमध्ये हवेच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणारी यंत्रणा देशात उभी राहू लागली आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी भारताने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम हाती घेतला आहे. यानुसार सन २०२६पर्यंत प्रदूषण पातळीमध्ये ४० टक्के कपात करण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले आहे.

## खेच ग्राहका अधिकार: शोषणमुक्तीचा मूलाधार!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जो जन्माला आला तो झाला ग्राहकच! गुंतवणूकदार हासुद्धा ग्राहक आहे. त्याचा हक्कासाठी न्यायालयीन आव्हानात्मक लढा सुरू आहे. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा, याकरिता विविध ग्राहक संघटना लोकांना जागरूक करीत आहेत. या सर्वांसाठी १५ मार्च हा दिवस खुप महत्त्वाचा आहे. हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो.**

१५ मार्च हा दिवस संपूर्ण जगात जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा होत असतो. ग्राहकांना सेवा पुरवताना होणाऱ्या हलगर्जीपणामुळे सन १९६० साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यास एक व्यासपीठ तयार करण्यात आले. त्यासाठी जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला युनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसारच दरवर्षी १५ मार्चला हा दिवस विश्वभरात साजरा केला जातो. ग्राहकाला अर्थव्यवस्थेचा राजा असे संबोधले जात असले, तरी त्याला मात्र बाजारपेठेत सतत अडवले, नाडवले अन् फसवलेही जातच असते. बिच्चाऱ्याची अपेक्षा तरी काय असते हो? आपण खरेदी करत असलेली वस्तू योग्य दर्जाची, योग्य गुणवत्तेची व वाजवी किमतीची असावी, एवढीच त्याची किमान अपेक्षा असते. पण त्याच्या नशिबी मात्र सतत अपेक्षाभंग आणि मनस्तापच! ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून त्याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दि.२६ डिसेंबर १९८६ या दिवसापासून भारत सरकारने ‘ग्राहक संरक्षण कायदा’ अंमलात आणला. परंतु केवळ कायदा करून त्यामागील उद्दिष्ट साध्य होत नसते. हा कायदाही त्याला अपवाद नाही. कायदा अस्तित्वात येऊन ३६ वर्षे झालीत, पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल, तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे, तो घटक- ग्राहक आधी जागृत असायला हवा. कायद्याचे शस्त्र त्याला पेलता यायला हवे. अन्यथा निरक्षरांपुढे शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ ठेवण्यासारखाच तो प्रकार होईल. बाजारपेठेत दूध किंवा शीतपेय एमआरपीपेक्षा अधिक किमतीने घ्यावे लागते. भाजीवाला तराजूत वजनाऐवजी दगड ठेवतो. दुधात भेसळ होते. टॅक्सीवाल्यांची लुबाडणूक आपण निमूट सहन करतो. बिल्डर, फायनान्स कंपन्या, प्रवासी कंपन्या, वस्तूंचे उत्पादक आपल्याला फसवताहेत, हे सगळे का? कारण एकच, अजूनही आपल्यातील शोषणाविरुद्ध लढणारा खरा ग्राहक बाहेर येत नाही. ग्राहकांच्या हितसंबंधाचे अनुचित प्रथांपासून संरक्षण करणे हे आज ग्राहक चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. त्यासाठी करावी लागणारी ग्राहक जागृती, वेळेप्रसंगी द्यावे लागणारे न्यायालयीन लढे हे सगळेच आव्हानात्मक आहे. कधी कधी तर ही लढाई असते एकट्याची. त्यासाठी वेळप्रसंगी ग्राहक संघटनांचीही मदत घ्यावी लागते, तर कधी ग्राहक संघटना व्यापक ग्राहकहीत लक्षात घेऊन प्रातिनिधिक लढे लढतात. परंतु त्यासाठी समाजातील प्रत्येक ग्राहकाचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती आणि चिकाटीची. भारतासारख्या विकसनशील देशात खऱ्या अर्थाने ग्राहक संरक्षण व्हायचे असेल तर ग्राहक प्रशिक्षण, ग्राहक प्रबोधन व ग्राहक जागृती होणे अत्यावश्यक आहे. अनेकविध समस्यांच्या चक्रव्युहात सापडलेल्या ग्राहकांचे प्रश्न अनंत आहेत. कामे ठेकेदाराला सुपूर्द करून प्रश्न सुटत नसतात. संप, बंद, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको यासारख्या आंदोलनानेही प्रश्नांची स्थायी स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या आधारे काही प्रश्न सोडविता येतीलही, पण त्यालाही मर्यादा आहेतच. म्हणून आपले प्रश्न सोडविण्यास स्वतःच पुढाकार घ्यावा लागतो. स्वतःच स्वतःची शक्ती निर्माण करावी लागते अन् वाढवावीही लागते. त्याचसाठी हवे असते प्रशिक्षण, प्रबोधन व जागृती. शोषणमुक्तीचा तोच मूलाधार! ग्राहक चेतनेतून अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवता येईल आणि हेच कार्य ग्राहक पंचायत ही स्वायत्त संस्था करीत आहे. ग्राहक एवं राजा मानणारी ग्राहक पंचायत ही विचाराधिष्ठित संघटना आहे. आज अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. सेल, एकावर एक फ्री, लॉटरी, कन्सेशन, बक्षीस, आदींच्या रूपाने नको त्या वस्तूंची अडगळ घरात वाढत आहे. भेसळयुक्त दूध, अन्न आणि औषधेसुद्धा पोटात जावून व्यक्तीसह समाजस्वास्थ्य बिघडत आहे. म्हणूनच असे वाटते की, ग्राहकराजा गुलाम होऊन आज बाजारात उभा आहे. हे चित्र बदलून त्याला खऱ्या अर्थाने राज्याभिषेक करायचे व्रत स्वीकारले. शोषणमुक्तीसाठी पुढाकार घेऊन ग्राहक संरक्षण कायदा करण्यास शासनाला भाग पाडले. या कायद्याने त्रिसदस्यीय न्यायासन अभिप्रेत आहे. त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हे न्यायासनाचे अध्यक्ष व उर्वरित दोन व्यक्तींपैकी एक स्त्री, अर्थ, कायदा, प्रशासन, व्यापार या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात, अशी तरतूद आहे. या १५ मार्च आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनाचे वेगळेच महत्त्व आहे. १५ मार्च १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकन संसदेपुढे केलेल्या भाषणात तेथील ग्राहकांना त्यांचे- सुरक्षितता, माहिती, निवड आणि प्रतिनिधित्व हे चार हक्क प्रदान केले. त्यानंतरच्या कालावधीत ग्राहक संस्थांच्या जागतिक संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघाशी चर्चा करून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांत मूलभूत गरजा पुरविण्याचा हक्क, तक्रार निवारण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्क आणि स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, या आणखी चार ग्राहक हक्कांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. अशाप्रकारे हे आठ ग्राहक हक्क आज जगभर मान्य झाले आहेत.

ग्राहकांना गृहीत धरू नका, तो आहे म्हणून तुमचा व्यवसाय आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वापरणाऱ्या ग्राहकांची विविध माहिती प्रचंड प्रमाणात जमा होते. ग्राहकांची खाजगी माहिती उघड करू नये. त्याचे बंधन कंपन्यांवर असावे. अवैध व्यावसायिकांवर कारवाई करावी. ग्राहक संरक्षण सुधारणा कायदा २०१९मध्ये आला. त्यात ग्राहक हक्काच्या अनेक तरतुदी आहेत. जाहिरातीत खोटे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे एफडीएला अधिकार आहेत. जाहिरातीतील दावे प्रमाणित करण्याची कंपन्यांना आवश्यकता आहे. नमूद केलेली सेवा कंपन्यांना द्यावीच लागेल. गोडाऊनमध्ये होणाऱ्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्याची गरज आहे. नवीन सुधारित कायद्याची अंमलबजावणी व्हावी. केंद्राने २०१९मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात सुधारणा केली. पण त्याचे नियम तयार नाहीत. तातडीने अंमलबजावणी व्हावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप नको. ग्राहकांना हक्काची जाणीव होऊन लोकशाही दिनाच्या तक्रारी वाढाव्यात. ग्राहकांच्या हक्कासाठी केंद्रात ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्रालय वेगवेगळे करावयास हवे. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कार्यालय उघडावे. राज्यात स्वतंत्र ग्राहक संरक्षण मंत्रालय स्थापन करावे.




प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उघडून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यात नेमणूक करावी आणि ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीची जबाबदारी त्यांच्याकडे द्यावी. त्यामुळे ग्राहकांशी संबंधित तक्रारींना तातडीने न्याय मिळेल. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे ग्राहकांना नियमाप्रमाणे ९० दिवसांपर्यंतही न्याय मिळत नाही. निकाल लागला तरी मात्र अंमलबजावणी काही होत नाही, हा एक जटील प्रश्न आहे! आपण ग्राहक म्हणून वावरताना खुपदा प्राप्त अधिकारांची आणि हक्कांची पायमल्ली होते. अशावेळी ठामपणे, चिकाटीने अधिकारांची अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढत आहे. मात्र या डिजिटल सेवा नीट समजून घेण्याची, त्यांचा वापर योग्यप्रकारे करण्याची आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हे दाखवून देण्याची खरी हीच वेळ आहे!

## लैंगिक असमानता



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**महिला दिनाच्या निमित्ताने लेख लिहून त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल रोष व्यक्त करायचा अन् नंतर येते माझ्या मागल्या म्हणत पुन्हा जैसे थे परिस्थिती, अशी आपली नाटकी भूमिका असते.अनेक अन्यायाना वाचा फुटत नाही.अनेक बाबतीत तर आपण अनभिज्ञ असतो.नुकताच तापसी पन्नू या गुणी अभिनेत्रीची एक बेधडक मुलाखत यू ट्यूब वर पाहण्यात आली.ही अभिनेत्री संगणक इंजिनियर आहे.शिखा वरील अत्याचाराची साक्षीदार आहे.तिला जेव्हा हीरो अन् हिरोईन याच्या मानधना बद्दल विचारले तेव्हा तिचे काहीसे अडखळत पण स्पष्टपणे दिलेले उत्तर धक्कादायक होते. हीरो अन् हिरोईन च्या मानधनातील फरक १००:३या प्रमाणात आहे! म्हणजे हीरोला १००लाख मिळत असतील तर नायिकेला फक्त ३लाख मानधन मिळते!**

हा भेदभाव इथेच थांबत नाही. तर पडद्यावरील स्पेस देखील नायकाला जास्त तर नायिकेला फार कमी मिळते. नायकालाच भव्य तऱ्हेने प्रोजेक्ट केले जाते. नायिकेला दुय्यम स्थान मिळते. नायक कितीही उशीरा आला तरी चालते. पण नायिके ने मात्र मेकअप लावून तयार राहणे अपेक्षित असते असेही तिने सांगितले. आतापर्यंत आपण मी टू प्रकरणा बद्दलच ऐकून होतो. दिग्दर्शक, निर्माते याच्या कडून होणाऱ्या आर्थिक, शारीरिक पिळवणूक, याबद्दल ऐकून होतो. पण मानधना तील ही तफावत थक्क करणारी आहे. नायिकांना ही तेव्हढाच वेळ द्यावा लागतो. तेव्हढेच कष्ट घ्यावे लागतात.मग हा भेदभाव का? थोडेफार कमी जास्त आपण समजू शकतो. पण एव्हढी तफावत थक्क करणारी आहे. इतर बहुतेक क्षेत्रात समान काम समान वेतन असते. काही ठिकाणी फरक असतो. पुरुष मजूर, महिला मजूर याच्या मजुरीत तफावत असते. पण इतकी डोळ्यात भरेल अशी नाही. विमान कर्मचारी,संशोधन संस्थेतील वैज्ञानिक, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर यांना साधारण समान वेतन असते. त्यामुळे चित्र सृष्टी तील हा भयंकर भेदभाव अन्याय कारक वाटतो



महिला साठी.

चित्रपट प्रदर्शित झाल्यावर कोणता चित्रपट बॉक्स ऑफिसवर किती गल्ला गोळा करतो याचे आकडे प्रसिध्द होत असतात.ते दिवसाला १००कोटी वगैरेच्या घरात असतात! ही शेकडो कोटीची कमाई कुणाला कशी वितरित केली जाते? दिग्दर्शक, संगीतकार, गायक, हीरो,हिरोईन, इतर कलाकार, तंत्रज्ञ असे कुणाला किती पैसे मिळतात? त्यांच्यात लेखी करार होतात का? निर्मात्याचा फायदा किती असतो? प्रत्येक चित्रपटाचे जमा खर्चाचा हिशेब असतो का? त्यावर इन्कम टॅक्स विभागाचे लक्ष असते का? हे नायक, नायिका, गायक, संगीतकार जेव्हढे पैसे मिळतात त्यावर प्रामाणिक कर भरतात का? याच्यावर आय टी ची धाड पडली असे क्वचितच घडते. एरवी सामान्य व्यक्तीला पाच दहा हजार मानधन मिळाले तरी दहा टक्के टॅक्स आधीच कापून घेतात.पगारधारकाचा कर अगाऊ कापल्या जातो.तसाच योग्य तो कर ही चित्रपट सृष्टीतील मंडळी भरतात का? हे असे प्रश्न नेहमीच अनुत्तरीत राहतात.

एरवी छोट्या मोठ्या महिला विषयक तक्रारीची दाखल राज्य किंवा केंद्र महिला आयोग घेतं. पण बॉलीवूड मधील महिलांना मिळणारी दुय्यम ट्रीटमेंट त्यांच्या ध्यानात, कक्षेत येत नाही काय? या अन्यायाकडे महिला आयोग कानाडोळा कसे करू शकते? की तक्रार आली तरच आम्ही कारवाई करू एरवी दुर्लक्ष करू असे त्यांचे धोरण आहे? कळायला मार्ग नाही. महिला, नट्या तक्रार करायला सहसा पुढे येत नाहीत. तसे केले तर पुढे काम मिळणार नाही ही भिती असते. नायक, निर्माते दिग्दर्शक अशा नट्या वर बहिष्कार टाकण्याची भिती वाटते. कारण तू नहीं ऑर सही असे त्यांचे धोरण असते. त्यामुळे त्या तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करतात. इतर सर्व व्यवसायात पैशाचे व्यवहार स्वच्छ, स्पष्ट असावेत ही अपेक्षा सरकारची असते. पण बॉलीवूड अन् तत्सम काही व्यवहाराला वेगळ्या दृष्टीने बघितले जाते. त्याच्या गैव्यवहारप्रकरणी दुर्लक्ष केले जाते. म्हणूनच या मंडळी चे फावते. त्यांना मोकळे रान मिळते. आता तर सिनेमा बरोबरच टी वी मालिका, ओ टी टी प्लॅटफॉर्म, वेब सिरीज अशी अनेक नवी दालने उघडली आहेत. मराठीत नाट्य क्षेत्र बरेच प्रभावी आहे.हे सगळेच आर्थिक व्यवहार, तिथे महिलांना मिळणारी वागणूक,त्याच्या बाबतीत होणारा आर्थिक पक्षपात याकडे सरकारी यंत्रणेने जातीने लक्ष घातले पाहिजे. महिलांवर अन्याय,अत्याचार होणार नाही हे पाहिले पाहिजे. या प्रत्येक क्षेत्रात संघटना देखील कार्यरत असतात. त्यांनीही या प्रकरणात लक्ष घातले पाहिजे. कुठेही महिलांवर अत्याचार, अन्याय होता कामा नये. तापसी पन्नू ने घंटा वाजवली आहे. संबंधितांनी आता तरी जागे व्हायला हवे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# तहसीलदार माधव बोथीकर यांच्या पुढे गौण खनिज माफीयांचे मोठे आव्हान!

आधुनिक केसरी न्यूज

**दिनेश चौधरी**

**पुर्णा :** तालुक्याच्या तहसिलदार पल्लवी टेमकर यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या जागेवर आलेले नवनियुक्त तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी नुकताच पदभार स्विकारला असून तहसिलदार श्री.बोथीकर यांच्या पुढे गौण खनिज रेती/मुरुम/दगड खडीसह माती आदी गौण खनिज माफीयाशाहीचे मोठे आव्हान असून या माफीयाशाहीचा विमोड करीत शासकीय गौण खनिज रेतीचे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या अवैध उत्खननासह प्रचंड प्रमाणात होणारी चोरटी वाहतुक रोखण्याच्या दृष्टीने ते कठोर पाऊल उचलून या बेलगाम माफीयाशाहीला अंकुश लावतात की हिरवा कंदील दाखवतात हे येणारा काळच स्पष्ट करणार आहे. पुर्णा तालुक्यातून वाहणाऱ्या पुर्णा-गोदावरी नदीतील शासकीय गौण-खनिज रेतीचे प्रचंड प्रमाणात होणारे अवैध उत्खननासह चोरटी वाहतूक चोखण्यात महसुल प्रशासनासह पुर्व तहसिलदार टेमकर यांना अपयश आले होते त्यामुळे पुर्णा-गोदावरी नद्यांवर अक्षरशः असंख्य रेती तस्करांच्या टोळ्या तुटून पडल्या होत्या त्यामुळे पुर्णा-गोदावरी नद्यांची पात्र अक्षरशः कोरडीठक्क




पडली याचा सर्वात जास्त परिणाम कृषी उद्योगावर पडला यास सर्वस्वी महसुल प्रशासनातील झारीतील शुक्राचार्यच जवाबदार असल्याचे नदीकाठांवरील शेतकरी वर्गातून बोलल्या जाते. पुर्णा-गोदावरी नदीपात्रांतील रेतीसह शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडवून बिना परवाना चालणाऱ्या दगड खदान खडी क्रशर चालकांवर देखील तहसिलदार श्री.बोथीकर यांना लक्ष केंद्रित करुन शासनाच्या महसुलात वाढ करावी लागणार आहे कारण मागील वर्षी १६ डिसेंबर २०२२ रोजी पुर्णा तालुक्यातील तब्बल १४ खडीक्रशर व दगडखानपट्टे सिल करण्याचे नाट्य रंगवून दि.१९ डिसेंबर २०२२ जिल्हा खनिकर्म अधिकारी परभणी यांना गौण खनिजाच्या अनाधिकृत उत्खननासह दगडखानपट्टे/दगडगिट्टी मोजनी करीता ड्रोन उपलब्ध करुन देण्याची लेखी पत्र क्र.जा.क्र.२२२/गौण खनिज/कावी या पत्राद्वारे मागणी केली परंतु प्रत्यक्षात मात्र कोणत्याही प्रकारची कारवाई न करता संबंधित खडीक्रशर व दगडखानपट्टे धारकांना पाठीशी घालण्यात आल्याचा गंभीर प्रकार घडला होता परंतु या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली हे अद्यापही गुलदस्त्यातच असून संबंधित खडीक्रशर व दगडखानपट्टे आज देखील पुर्वी प्रमाणेच सुरू असल्याचे निदर्शनास येत असून संबंधित खडीक्रशर व दगडखानपट्यांवर एकतर कायदेशीर कारवाई करणे किंवा त्यांना अधिकृत परवाने बहाल करीत त्यांच्याकडून महसुल वसूल करीत शासकीय महसुलात वाढ करण्याच्या आवाहनासह निरंकूश झालेल्या महसुल प्रशासन व पुरवठा विभागाला देखील नियंत्रित करुण शिस्त लावण्याचे आवाहन नुतन तहसिलदार बोथीकर यांच्यापुढे आहे.या संदर्भात नुतन तहसिलदार माधवराव बोथीकर काय निर्णय घेतात हे लवकरच समोर येईल.




# अत्याचार प्रकरणी आरोपीस वीस वर्षे सक्तमजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वडिलांच्या मोबाईलवर फोन कॉल करून एका 13 वर्षीय अल्पवयीन मुलीला घरी बोलावून तिच्यावर बलात्कार करणाऱ्या तालुक्यातील लोणी ( बु. ) येथील एका बलात्काऱ्यास येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने 20 वर्षांच्या सक्तमजुरीसह पाच हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

जमील अमीर शेख ( 30, रा. लोणी ( बुद्रुक ) असे शिक्षा ठोठाविलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील लोणी ( बुद्रुक ) येथील एक 13 वर्षीय मुलगी जमील शेख याच्या किराणा दुकानात नेहमी सामान घेण्यासाठी जायची. यानिमित्ताने तिची जमीलशी ओळख झाली. पीडीता जेव्हाही दुकानात सामान विकत आणण्यासाठी जायची तेव्हा जमील हा तिला म्हणायचा की, 'तू मला फार आवडते, माझे तुझ्यावर प्रेम आहे.' दरम्यान 11 मे 2021 रोजी रात्री 09.00 वाजेच्या सुमारास पीडीतेसह तिचे आई, वडील व काकांनी सोबत जेवण केले. त्यानंतर रात्री 12.00 वाजेच्या सुमारास जमील शेख याने पीडीतेच्या वडीलांच्या मोबाईलवर फोन करून 'मी जमील दुकानदार बोलत आहे. तू मला आत्ताच भेटायला ये, तू आली नाही तर मी तुझ्या आईवडीलांना जिवे ठार मारील.' अशी धमकी दिल्याने पीडीता घाबरली व ती काहीही सांगता घरातून जमील शेख याला भेटण्यासाठी रात्री 01.30 वाजेच्या सुमारास गेली. त्यानंतर तिला घरात बोबोलावून तिच्यावर बलात्कार केला. घटनेनंतर पीडितेने वैजापूर पोलिस ठाणे गाठून याबाबत तक्रार



दिली. तिने दिलेल्या फिर्यादीवरून जमील शेख याच्याविरुद्ध अनुसूचित जाती - जमाती प्रतिबंध कायद्यासह बाललैंगिक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणात सरकारी वकील नानासाहेब जगताप यांनी सरकार पक्षाच्यावतीने एकूण सात साक्षीदार तपासले. यात पीडीत मुलीसह अशोक भागवत, शिक्षक प्रशांत चौधरी, डॉ ऐश्वर्या मुग्रेश, तपासी अधिकारी तथा तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी कैलास प्रजापती यांची साक्ष महत्वाची ठरली. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. मोहियोद्दीन एम. ए. यांनी दोन्हीही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेऊन जमील शेख याला कलम 376 ( डी ए ) व कलम 4 बाललैंगिक अत्याचार कायद्यान्वये वीस वर्षांच्या सक्तमजुरीसह पाच हजार दंड व दंड न भरल्यास सहा महीने साध्या कैदेची शिक्षा ठोठावली आहे. तसेच कलम 506 ( 02 ) अन्वये एक वर्षे सक्तमजुरी व हजार रुपये, दंड न भरल्यास एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील नानासाहेब जगताप यांनी काम पाहिले.
















# कर्मचाऱ्यांवर जनतेचा रोष का ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी सरकारी कर्मचारी वर्ग आंदोलन करत आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन करणे लोकशाही मजबूत असल्याचे चिन्ह आहे. आजपर्यंत अनेक आंदोलने वेगवेगळ्या मागण्यांसाठी देशांमध्ये झालेले आहेत. आणि आंदोलनाच्या माध्यमातून अनेक न्याय सुद्धा मिळालेले आहेत. परंतु जुनी पेन्शन योजना लागू व्हावी म्हणून कर्मचारी आंदोलन करत असताना जनसामान्यांमध्ये प्रचंड रोष दिसून येत आहे. आणि कदाचित एखाद्या आंदोलनाविषयी सर्वसामान्यांचा असा रोष व्यक्त होण्याची ही पहिलीच घटना असावी.**

आंदोलनाला विरोध होतो असं नाही आज पर्यंत एखाद्या आंदोलनाला विरोध झालाच तर एखादी संघटना आंदोलन करणारी असायची, आणि एखादी संघटना त्याला विरोध करणारी किंवा सदर आंदोलन चुकीचे आहे असं मानणारे असायची. परंतु जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी कर्मचाऱ्यांनी जे आंदोलन सुरू केले आहे या आंदोलनाला सर्वसामान्य लोकांनी जात, धर्म, पक्ष, संघटना या कोणत्याही बाबीचा विचार न करता केवळ आणि केवळ कर्मचारी करत असलेली मागणी सरकार मान्य करेल की नाही हे माहिती नाही, परंतु सर्वसामान्य लोकांनी ती अमान्य तर केलीच, परंतु प्रचंड रोष सुद्धा व्यक्त केलेला आहे. कर्मचाऱ्यांचे आंदोलन हे कर्मचाऱ्यांचे बंद केलेले पेन्शन लागू करण्यासाठी सरकार विरोधात आहे. सरकार विरोधात असलेले हे आंदोलन जनता का नाकारत असेल बरं ? फक्त नाकारत नाहीये तर त्यांच्या भावनेचा जर विचार केला तर जनतेच्या मनामध्ये कर्मचाऱ्यांविषयी फक्त नाराजीच नाही तर राग सुद्धा आहे. कोणत्याही आंदोलनावर आजपर्यंत अशा शब्दात टीकाटिप्पणी झाली नसेल अशा शब्दात टीकाटिप्पणी या आंदोलनावरती होत आहे. आंदोलकांना भ्रष्टाचारी काम चुकार समाजाची जाणीव नसलेले कर्तव्याची जाणीव नसलेले लाचखोर म्हणून उल्लेख करण्यात येत आहे. सदरची परिस्थिती बघता ज्यांना सामान्य माणसांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांविषयी आदर आपुलकी दिसून येत नाही ही परिस्थिती कशी निर्माण झाली ? याला जबाबदार कोण ? यावर सरकारी कर्मचारी चिंतन मननं करतील काय ? सरकारी कर्मचारी लाच घेतल्याशिवाय कामच करत नाहीत जनतेचा आवाज मनापासून निघत असल्याचे दिसत आहे. परंतु जनतेचे हे मत खोटे आहे हे सरकारी कर्मचारी सिद्ध करणार का ? जनतेने केलेल्या आरोपाचा डाग घेऊनच सरकारी कर्मचारी जगणार ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी सरकारी कर्मचारी असतात परंतु येथे कर्मचाऱ्यांवरती जनतेचा विश्वासच नसेल तर हा विश्वास संपादन करण्यासाठी सरकारी कर्मचारी यानंतर भूमिका घेतील का ? सर्वसामान्य जनतेचा रोष जनतेचे मते बघितले असं वाटतंय सर्वसामान्य जनतेला कर्मचाऱ्यांनी खूप त्रास दिलेला आहे. लाचेच्या नावाखाली संपत्ती कमावलेली आहे आणि याच गोष्टी जनतेच्या तोंडून बाहेर पडत आहेत. सरकारी कर्मचारी हे जनसेवक असतात आणि जनसेवकाविरुद्ध एका मताने सर्व जनता विरोधात जात असेल तर ही परिस्थिती देशासाठी, समाजासाठी खूप घातक आहे. सरकारी कर्मचारी सामाजिक कार्य तर सोडा त्यांचीच जबाबदारी जबाबदारीने पार पाडत नाहीत, वेळेवर हजर न राहणे, जनतेशी आपुलकीने न बोलणे, असे कर्मचाऱ्यांचे वर्तन असते मग काम चुकारपणा करायचा, वेळेवरती काम करायचे नाही, सर्वसामान्य जनतेला वेठीस धरायचे असे अनेक प्रश्न असताना कर्मचाऱ्यांना पेन्शन नेमके कोणत्या कामासाठी द्यायचे हा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे. आता हा भाग झाला जनतेच्या मताचा परंतु जनतेचे मत खोडून काढण्यासाठी सरकारी कर्मचारी काय भूमिका घेतात हे बघणे सुद्धा गरजेचे आहे जर सर्वसामान्य लोकांच्या या प्रश्नाला कर्मचाऱ्यांनी उत्तर दिले नाही तर ते भ्रष्ट काम चुकार लाचखोर आहेत हेच सिद्ध होईल, सर्वसामान्य जनतेची जनभावना लक्षात घेऊन जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देणे किंवा पेन्शनला सर्वसामान्य लोक विरोध का करतात या बाबीचे चिंतन करणे व सरकारी कर्मचाऱ्यांना आवश्यक आहे. जर या गोष्टीवर त्यांनी




चिंतन केले नाही तर सरसकट कर्मचारी हे लाचखोर भ्रष्टाचारी व कामचुकार असल्याचे जाहीर होईल परंतु सर्वसामान्य लोकांचा एवढा राग निर्माण होईपर्यंत जबाबदारी आणि पातळी सोडून काम करणे हे सरकारी कर्मचाऱ्यांना शोभनीय नाही. सरकारी कर्मचाऱ्यांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन हा खूप आदरपूर्वक व बौद्धिक असतो पण या जुनी पेन्शन योजना आंदोलनाच्या माध्यमातून जनता कर्मचाऱ्यांना एक तर बुद्धिमान समजत नाही, आणि आदर तर कुठेच दिसत नाही. सरकारी कर्मचाऱ्यांनी स्वतःचे महत्त्व स्वतःचा अभिमान स्वाभिमान स्वतःच्या हातानेच कमी केल्याचे चित्र दिसत आहे. सामाजिक समस्ये वरती सामाजिक कार्यावरती किंवा समाजातील दुर्बल घटकांना मदत न करता कर्मचारी स्वार्थी वृत्तेने स्वतःचा फायदा बघतात. आणि सर्वसामान्य जनतेने मांडलेल्या समस्येवर लवकर तोडगा मिळत नाही त्यांच्या समस्येला महत्त्व दिले जात नाही, सरकार दरबारी सर्वसामान्य जनतेचा सन्मान होत नाही अशी वागणूक कर्मचाऱ्यांकडून जनतेला मिळत असेल तर सहाजिकच आहे, जनता ही कर्मचाऱ्यांच्या विरोधात जाणार. सर्व सामान्य जनतेकडून लाच घेताना सर्वसामान्य जनतेच्या पैशाचा गैरवापर करून भ्रष्टाचार केल्याचे अनेक उदाहरणे समोर आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही परंतु सर्वच कर्मचारी भ्रष्ट लाचखोर व कामचुकार आहेत का कारण सरसकट कोणावरही आरोप प्रत्यारोप करणे योग्य नाही. पण या प्रकरणांमध्ये सरसकट कर्मचारी लाचखोर आणि कामचुकार नसले तरीही, भ्रष्ट काम चुकार आणि लाचखोर कर्मचाऱ्यांविषयी हे कर्मचारी बोलले नाही. म्हणजेच भ्रष्ट कामचुकार आणि लाचखोर कर्मचाऱ्यांना यांची मुख समिती होती असेच दिसून येते.

एकदा सरकारी नोकरी मिळाली की स्वतःला विद्वान समजून इतरांना तुच्छ अडाणी समजून त्यांच्याकडे सरकारी कर्मचाऱ्यांचा बघण्याचा दृष्टिकोन हा बदललेला असतो, परंतु शासकीय नोकरी नसणे हा गुन्हा तर नाही ना ? थोडक्यात सरकारी नोकरदारांनी नोकरी लागल्यानंतर समाजाची व परिस्थितीची जाणीव न ठेवता एक आपला स्वतंत्र परिघ निर्माण करून परिघांमध्येच जगायला लागलीत आणि म्हणूनच सर्वसामान्य जनतेपासून त्यांची आपुलकीची नाळ तुटली की काय असेच दिसून आले. शेतकरी समस्या विद्यार्थी समस्या महागाई विरोधात न बोलणारे किंवा या विरोधात बोलणाऱ्यांना सहकार्य न करणारे वैयक्तिक फायद्यासाठी कोणत्याही परिणामांचा विचार न करता एकत्र येत आहेत, ही गोष्ट जनतेला आश्चर्य करून सोडणारी आहे आणि म्हणून प्रत्येक ठिकाणी कर्मचारी आणि फक्त स्वतःचा फायदा बघतो जनतेचा कोणताही विचार करत नाही. म्हणूनच जनतेचा रोष हा सरकारी कर्मचारी वर्गाने विरुद्ध वाढलेला आहे. हा रोष कमी करण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य लोकांसोबत आदराने प्रेमाने राहून कोणत्याही प्रकारची लाच न घेता, जनतेच्या पैशाची हेराफेरी न करता, वेळेवरती कामे करणे हा एकमेव उपाय आहे. आणि या आंदोलनाला होत असलेला विरोध पाहून ही गोष्ट सरकारी कर्मचाऱ्यांच्या लक्षात येईल ही अपेक्षा. सदर आंदोलनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे ते खरोखर समाजामध्ये आदर निर्माण करू शकले नाही. सरकारी नोकरीचा गर्व करून समाजातील लोकांसोबत योग्य व्यवहार केला नाही. म्हणून आज समाजातील लोकांनी त्यांच्या मनातील सरकारी नोकरदारांना विषयी असलेला आदर भाव आणि आपुलकी आंदोलनाला विरोध करतांना जी काही भाषा वापरली त्यातून दाखवून दिलेला आहे. म्हणून शासकीय नोकरीचा गर्व न करता सर्वसामान्य लोकांना, समजला, आपण त्यांच्यापासून वेगळे आहोत असे न समजता आपण समाजाचा घटक आहोत आणि याच घटकांची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे, हे डोळ्यासमोर ठेवून काम जर केले तर येणाऱ्या काळात सरकारी कर्मचारी सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये आदर, आपुलकी व प्रेम निर्माण करू शकतील. नाहीतर भ्रष्ट, लाचखोर आणि कामचुकार मिळालेली ओळख कायम राहील.

# औषध कंपन्यांकडून रुग्णांची आर्थिक लूट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**औषध कंपन्या एमआरपीच्यां नावावर रुग्णांची मोठ्यप्रमाणावर आर्थिक लूट करत असून या औषध कंपन्यावर नियंत्रण ठेवण्यास सरकार अपयशी ठरत आहे.रुग्णांना औषधांची विक्री करताना इंजेक्शन, औषधे, सर्जिकल साहित्य एमआरपी दराने विकले जाते. त्यामुळे विक्री किमतीवर कोणताही आक्षेप घेता येत नाही. त्याचा फायदा उचलून अनेकपट नफा मिळवला जातो. काहीवेळा एमआरपीत काहीशी सूट देऊन रुग्णाला खूश ठेवण्याचा प्रयत्न केला जातो, पण अवाजवी मिळणारा नफा विचारात घेता मिळणारी सवलत अल्पप्रमाणात असते.**

नेमका किती नफा मिळवायचा याबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश नसल्याने पिळवणूक सुरूच राहते. त्यामुळे राष्ट्रीय औषधे किंमत नियंत्रण प्राधिकरणाने याबाबत लक्ष घालून सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्याची मागणी नागरिकातून होत आहे.

औषधांच्या किमतीवर नियंत्रण आणि निगराणी नॅशनल फार्मास्युटिकल प्रायसिंग ॲथॉरिटी करते. ते बहुतांश नियंत्रित वर्गातील सिंगल मॉलिक्यूल औषधांची एमआरपी ठरवते. कंपन्या त्याचाच फायदा घेतात. उदा. कोविड-१९ च्या उपचारात दिलेले ॲंटिबायोटिक डॉक्सिसायक्लिन. कंपन्यांनी त्याचे कॉम्बिनेशन ड्रग बनवले, नाव बदलले आणि ते मूल्य नियंत्रण यादीतून बाहेर पडले. ॲसिडिटीच्या 'ॲसिलॉक' या जुन्या, स्वस्त औषधाचे प्रकरणही असेच आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन म्हणजेच IMA चे माजी अध्यक्ष डॉ. के.के. अग्रवाल म्हणतात की सरकारने अत्यावश्यक गोष्टींबाबत पावले उचलली आहेत, पण मार्जिन अत्यावश्यक नसलेल्या सिरिंजवर 700 आहे. % ते 800% वाढले आहे. कंपन्या त्यांच्या आवडत्या किमती सिरिंजवर छापतात.

केवळ 874 औषधांवर सरकारचे नियंत्रण ही केवळ एका औषधाची नाही तर शेकडो औषधांची गोष्ट आहे, जी भारतात उत्पादित आणि विकली जातात. देशातील औषधांच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी NPPA म्हणजेच नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटी आहे. देशात 10 हजारांहून अधिक औषधे तयार आणि विकली जातात. मात्र यापैकी केवळ ८७४ जीवनावश्यक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे.

याचा अर्थ 874 वगळता उर्वरित औषधे औषध कंपन्यांकडून एमआरपीवर विकली जात आहेत. मात्र प्रत्यक्षात ते मनमानी दर आकारत आहेत. पण ही MRP कशी ठरवली जाते, हे आता समजून घ्या. फार्मा कंपन्या औषधे बनवतात, त्यापैकी काही औषधांची एमआरपी सरकार ठरवते, काहींची नाही. कंपन्या त्यांचा खर्च आणि नफा जोडून वितरकाला देतात. वितरक किरकोळ विक्रेत्यांना 16% मार्जिन देतात आणि किरकोळ विक्रेते 8% मार्जिनवर विक्री करतात. जेनेरिक औषध शोधणे कठीण का आहे ? देशात सुमारे 3000 औषध कंपन्या औषधे तयार करतात. यापैकी 90% पेक्षा जास्त खाजगी कंपन्या आहेत. या खासगी कंपन्यांचे कारस्थान इतके शक्तिशाली आणि सरकारचे कायदे इतके कमकुवत आहेत की, भारतातील रुग्ण या आजारातून मुक्त झाल्यानंतरही महागड्या औषधांचा त्रास वर्षानुवर्षे सुरूच आहे. अशा परिस्थितीत महागड्या औषधांच्या जाळ्यातून तुम्ही आणि आम्ही कसे सुटणार असा प्रश्न पडतो. तर ब्रँडेड औषधांऐवजी जेनेरिक औषधे वापरणे हेच त्याचे उत्तर आहे. शेवटी ही जेनेरिक औषधे कोणती ? ते ब्रँडेड औषधांइतके प्रभावी आहेत का आणि जेनेरिक औषध शोधणे हे महासागरातून मोती काढण्याइतके कठीण का आहे. पाहा हा रिपोर्ट. रुग्णावर उपचार करताना डॉक्टर विविध प्रकारचा त्याग करण्याचा सल्ला देतात. पण अनेक डॉक्टर स्वतः एक गोष्ट टाळत आहेत आणि ती म्हणजे जेनेरिक औषधे. जेनेरिक औषध म्हणजे कोणत्याही औषधाचे रासायनिक नाव, ज्याला मीठ असेही म्हणतात. समजा तुम्हाला ताप आला आहे, तुम्ही पॅरासिटामॉल नावाचे औषध खाल्ले तर ते जेनेरिक औषध आहे. याच्या रसायनाचे नावही पॅरासिटामॉल आहे, पण पॅरासिटामॉल मिठापासून बनवलेल्या गोळ्यांना बड्या कंपन्यांच्या नावाने गुंडाळले की ते ब्रँडेड होतात. ज्या महागड्या किमतीत विकल्या जातात. जेनेरिकमध्ये, 500mg पॅरासिटामॉलच्या 1 टॅब्लेटची किंमत 50 पैसे आहे. पण जर ते ब्रँडेड असेल तर एका टॅब्लेटची किंमत रु.1 पर्यंत वाढते.

जेनेरिक आणि ब्रँडेड औषधांमधील हा फरक इतर औषधांमध्येही दिसून येतो. हे आणखी काही सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या उदाहरणाने समजून घेऊ. सिप्रोफ्लॉक्सासिन प्रमाणे जे सहसा जिवाणू संसर्गामध्ये दिले जाते. त्याच्या 500mg टॅब्लेटची किंमत 1 रुपया 85 पैसे जेनेरिक आहे. जे ब्रँडेड होताच 4 रुपये होतात. डायक्लोफेनाकचा वापर सांधेदुखी आणि जळजळ यांच्या उपचारात केला जातो, ज्याची किंमत ब्रँडेड आवृत्तीमध्ये 14 रुपये 80 पैसे आहे, परंतु जेनेरिक स्वरूपात 3 रुपये 30 पैसे आहे. निमसुलाइड जे ताप आणि वेदनांमध्ये वापरले जाते. त्याच्या एका गोळीची किंमत जेनेरिकमध्ये 2 रुपये आहे, जी ब्रँडेडमध्ये साडेपाच रुपयांपर्यंत वाढते. आता तुम्ही विचार करत असाल की याच मिठापासून बनवलेल्या औषधांच्या किमतीत ही तफावत का ?

आता समजून घेऊया की औषधे बनवण्यासाठी रसायनाला औषधाच्या रूपात मोल्ड करण्याचे काम केले जाते. एकच कंपनी जेनेरिक आणि ब्रँडेड अशी दोन्ही औषधे बनवते, परंतु आपल्या कंपनीच्या बॅनरखाली उत्पादित होणारी ब्रँडेड औषधे विकण्यासाठी कंपनी पॅकेजिंग, पुरवठा आणि विपणन यावर पूर्ण भर देते. लाखो रुपये खर्च केले जातात. डॉक्टरांपासून केमिस्टपर्यंत त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लालूच देऊन औषधोपचाराला प्रोत्साहन देण्यास सांगितले जाते. याचा परिणाम असा होतो की आपल्या देशात 6 ते 8 लाख मेडिकल स्टोअर्स आहेत, त्यापैकी फक्त 4-5 हजार जनऔषधी दुकाने आहेत. म्हणजे 1 टक्क्यांपेक्षा कमी, जर तुम्ही सामान्य मेडिकल स्टोअरमध्ये गेलात तर तुम्हाला जेनेरिक नावाने औषध मिळणार नाही. जेनेरिक औषधे कमी परिणामकारक असल्याचे सांगून ते औषध त्या कंपनीकडे सुपूर्द करतात ज्यावर त्यांना मोठे मार्जिन मिळते. सत्य हे आहे की जेनेरिक औषधे ब्रँडेड औषधांइतकीच प्रभावी असतात, ती ब्रँडेड औषधांप्रमाणेच उपचार करतात. पण भारतात




रुग्ण जेव्हा त्या डॉक्टरांपर्यंत पोहोचतो, ज्यांच्यावर औषध कंपन्या मेहरबान असतात. त्यामुळे ते डॉक्टर जेनेरिक औषधांऐवजी ब्रँडेड औषधे लिहून औषध कंपन्यांचे कर्ज माफ करतात आणि दुसरीकडे एखाद्या सामान्य केमिस्टच्या दुकानात जाऊन जेनेरिक औषध मागितले तर ते नाकारतात. जेनेरिक औषधे ब्रँडेड औषधांप्रमाणेच प्रभावी आहेत अंधश्रद्धेचा रोग आणि केवळ महागड्या वस्तूच चांगल्या मानण्याची मानसिकता हे औषधांच्या नावाखाली होणारी बेहिशेबी नफेखोरी हे प्रमुख कारण आहे.

दुसरे कारण म्हणजे काही डॉक्टर, केमिस्ट आणि फार्मास्युटिकल कंपन्यांचे संगनमत, जे तुम्ही आणि आम्ही जेनेरिक औषधांचा अवलंब करून तोडू शकतो. औषधांच्या किमतीमुळे तुम्ही तुमचा खिसा जळण्यापासून वाचवू शकता. ब्रँडेड विरुद्ध जेनेरिक औषध अशी ही लढाई सुरू आहे आणि हे युद्ध जेनेरिकने जिंकले तर देशातील औषधांच्या किमती मोजून दरवर्षी गरीब होत असलेले करोडो लोक गरिबांच्या दलदलीत जाण्यापासून वाचतील. सरकारने डॉक्टरांना जेनेरिक औषधे लिहून देण्याचे आवाहन केले असून, असे न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने दिला आहे. पण तरीही अनेक डॉक्टर जेनेरिक औषध लिहिण्यास टाळाटाळ करत आहेत. येथे आपण एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की देशातील सर्व डॉक्टर असे करत नाहीत. म्हणूनच आम्ही देशातील सर्व डॉक्टरांना आवाहन करू इच्छितो की त्यांनीही नफ्यासाठी महागड्या औषधांचे चक्र मोडून काढण्यासाठी पुढे यावे आणि जेनेरिक औषधांबाबतही जागरूक राहावे.

# डबल ढोलकीचं राजकारण किती दिवस ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या राजकारणात खा.संजय राऊताचं राजकारण स्वकेंद्रित असुन त्याच भुमिकेत प्रत्येक हालचाली त्यांच्या पहायला मिळतात. स्वत:च्या मनाला वाटेल ते बोलणं आणि निर्णयास येणं या प्रवासातून पुढे जाताना भुमिका देखील डबल ढोलकी बदडल्यासारखी असते. तीन वर्षात तीन वेळा भुमिका महाविकास आघाडीत असतानाच त्यांनी बदलल्या. 2019 नंतर राज्यात महाविकास आघाडीची स्थापना होवुन त्यांचं सरकार आलं. बारामतीच्या मळ्यात बसुन त्यांनी देशाचे नेतृत्व शरदचंद्र पवार साहेब हेच करू शकतात त्यांनाच युपीएचं अध्यक्ष बनवावं अशा प्रकारची ढोलकी वाजवली.**

दुसऱ्या वर्षात राहुल गांधी अपरिपक्व नेते आहेत असं म्हणत सहा महिन्याचा कालावधी जात नाही तोच काश्मिरात यात्रेत सहभागी झाले आणि देशाला राहुल गांधीच नेतृत्व देवु शकतात म्हणाले. काल परवा पुन्हा राहुल गांधी बॅकफुटवर असल्याचे सांगत देशाच्या राजकारणात उद्धव ठाकरे हाच चेहरा आता आश्वासक वाटतो असं म्हणत ठाकरे दिल्लीला निवासी राहणार असल्याचे संकेत दिले. विरोधी पक्षाची मोट बांधून उद्धव ठाकरेंकडे नेतृत्व मिळवण्याच्या जोरदार हालचाली राऊतांच्या पुढाकाराने सुरू असल्याचे देशात लक्षात येतं. सांगायचं एवढंच आहे ठाकरे जर आता आश्वासक राऊतांना वाटतात मग पवार साहेबांची क्षमता कशामुळे मागे पडली ?

तसं पाहता खा.संजय राऊत यांच्या बोलण्यावर त्यांच्याही सहकाऱ्यांचा विश्वास असेलच असं आता म्हणता येणार नाही. राजकारणात काम करताना ही व्यक्ती प्रत्येक मुव्हमेंटवर राजकिय भुमिका आणि शब्दांची प्रभुवळी वेगवेगळी घेत असल्याचा अनुभवाला नेहमीच येतं. मुळात राऊत स्वतःला महाराष्ट्राच्या राजकारणातील आत्मकेंद्र बिंदू समजत असावेत. आपण कितीही आणि काहीही बोललो तरी कुणी वाकडं करू शकत नाहीत हा त्यांचा अहमपणा नेहमीच उघडकीस आला तो भाग वेगळा. एखाद्या राजकिय नेत्यांनी वेगवेगळ्या वैचारिक भुमिका किती वेळा आणि कशा घ्याव्यात ? यालाही काही परिसीमा असतात. वेळ प्रसंगी रंग जरी बदलत नसतील पण मांडलेली भुमिका अगदी सरड्याच्या रंगासारखी बदलल्या जाते त्यावेळी सामान्य जनतेचा विश्वास त्यांच्यावर रहात नसतो.



राजकारणात भाकरी नेहमीच फिरवली पाहिजे असं शरदचंद्र पवारांनी विधानसभा निवडणुकीच्या जाहिर सभेत बीड जिल्ह्यात बोलुन दाखवलं होतं. पण राऊतांच्या सारखी नेते मंडळी वैचारिक भुमिका देखील अधुनमधुन वेळप्रसंगी बदलताना दिसते. 2019 ला राज्यात जनादेश वास्तविक पहाता भाजपा-शिवसेना महायुतीला मतदारांनी दिला होता पण केवळ मुख्यमंत्री पदासाठी जनादेशाची प्रतारना करून महाविकास आघाडी स्थापन करण्यामागे राऊतांची भुमिका अहम राहिली हे नव्याने सांगण्याची गरज नाही. कदाचित माझ्यामुळे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले हा अडीच वर्षाचा आनंद राऊतांना मिळाला असला तरी या साऱ्या भानगडीमुळे पक्षाचं किती वाताहत झाली ? याचि देहि, याचि डोळा ते पहात आहेत. देशाचे राजकारण करण्याएवढी ताकद संजय राऊतांच्या पक्षात मुळातच नाही. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत ठाकरे शिवसेनेचे निवडुन आलेले खासदार केवळ नरेंद्र मोदी लाटेमुळे आले हा विसर पडता कामा नये. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जो पक्ष जगाच्या पाठीवर सर्वात मोठा आणि देशाच्या संसदेत बहुमताने कारभार करतो. शिवाय देशात काँग्रेसमुक्ती होत असताना इतरांचं अस्तित्वही नगण्य झालं आणि भाजपा कानाकोपऱ्यात पोहोचला. एवढी प्रचंड ताकद असताना संजय राऊतांचा खटाटोप देशाच्या राजकारणात डोकावण्याचा हा राजकिय विनोद म्हणावा लागेल पण राजकारण देखील असंच असतं. एक माणुस देशाच्या राजकारणात ढवळाढवळ करू शकतो हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्नसुद्धा स्वकेंद्रित भुमिकेचा भाग होय. महाविकास आघाडीचे सरकार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे त्या दरम्यान देशाच्या राजकारणावर बोलताना संजय राऊतांनी युपीएचं नेतृत्व बदलण्याची भाषा केली. शरद पवारांना युपीएचं अध्यक्ष बनवावं यासाठी पुढाकार घेत राहुल गांधी अपरिपक्व नेते इथपर्यंत मजल गाठत दिल्लीच्या वाऱ्या केल्या. बिहार, तामिळनाडू अनेक राज्याचे दौरे केले. कारण पवारांना पंतप्रधान पदावर राऊतांना बसावं वाटत होतं. राहुल गांधींवर त्यांनी टिका केल्यानंतर महाविकास आघाडी ज्यांच्यामुळे स्थापन झाली त्या काँग्रेसवाल्यांना राग येणं साहजिकच पण पुन्हा राऊतांनी रंग बदलला. बारामतींच्या मळ्यात बसुन पवारांच्या नेतृत्वाचं तुणतुण काही दिवस वाजवलं. मध्यंतरी राहुल गांधींनी काढलेल्या भारत जोडो यात्रेत काश्मिरात जावुन सहभाग घेतला. गांधींची यात्रा देशात परिवर्तन करू शकते असं म्हणत राहुल गांधी क्षमतावान नेतृत्व सांगायला ते विसरले नाहीत. चार-सहा महिन्याला वेगळा साक्षात्कार त्यांच्या मनातला बाहेर पडतो. मी सांगेन तेच खरं. हुकुमशाहीचं राजकारण समाजात बिंबवण्याचा त्यांचा नेहमीचा राहिलेला प्रयत्न आजच्या काळात हास्यास्पद ठरतो. काल परवा त्यांनी राहुल गांधी बॅकफुटवर असल्याचे एका चॅनेलच्या मुलाखतीत सांगितलं. अलीकडच्या काळात शिवसेनेची झालेली वाताहत, राहिलेली शिवसेना वाचवण्यासाठी स्वतः उद्धव ठाकरे करत असलेला संघर्ष कदाचित या साऱ्या घडामोडीची जबाबदारी संशयाने आपल्याकडे येवु नये पुर्व खबरदारी म्हणुन की काय ? संजय राऊतांनी आता चक्क पवार साहेबांसह राहुल गांधींना मागे टाकलं आणि उद्धव ठाकरे विरोधकांना आश्वासक चेहरा म्हणून वाटु लागले असं म्हणत देशाच्या राजकारणात मुंबई सोडून दिल्लीला घेवुन जाण्याची तयारी त्यांनी सुरू केली. मध्यंतरी केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री मान यांनाही मातोश्रीवर आणुन केलेला राजकिय ड्रामा विरोधकांच्या एकजुटीचा पान्हा फुटल्यासारखा होता. बिहारमधुन नितीशकुमार, पश्चिम बंगालमधुन ममता बॅनर्जी अलीकडे राज्याच्या राजकारणात नव्याने वंचित आघाडीचा केलेला प्रयोग जणु काही राऊत आता विरोधकांची मोट बांधु लागले. मग पंतप्रधानाला दिलेलं पत्र असेल किंवा दिल्लीत उद्धव ठाकरेसाठी निवासी राहण्यास, घर शोधण्यास सुरू केलेली घाई असेल आणि या सर्व त्यांच्या धावपळीत पवार साहेबही मागे पडले आणि राहुल गांधीही मागे पडले. प्रश्न हा पडतो संजय राऊतांना शरद पवारांच्या पेक्षा देशाचं नेतृत्व करण्यासाठी उद्धव ठाकरे भारी का वाटु लागले ? मग पवार साहेबांची क्षमता कमी होण्याचं कारण काय ? वास्तविक पहाता महाविकास आघाडीच्या घटक पक्षासह हा आत्मचिंतनाचा विषय ठरू शकतो. बाकी काही असलं तरी संजय राऊताचं राजकारण डबल ढोलकीचं असुन राजकिय हवाबदल ओळखुन मातोश्रीवर घडामोडी निश्चित ते करू पहातात हे मात्र नक्की. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यादव, ममता बॅनर्जी यांच्यासारखी कितीतरी मोठे नेते इतर राज्यातुन राष्ट्रीय राजकारणात अनेक वर्षापासून काम करतात हे देखील लक्षात घेण्यासारखे.

# बळीराजाला सावरा

आधुनिक केसरी

**फेब्रुवारी मार्च महिना आला की बळीराजाच्या मनात धडकी भरते. कारण फेब्रुवारी मार्च महिन्यापर्यंत पिके काढणीला आलेली असतात वर्षभर केलेल्या मेहनतीचे फळ मिळणार असते. वर्षभराची बेगमी तयार झालेली असते त्यामुळे चेहऱ्यावर समाधानाचे भाव असतात मात्र त्याचवेळी मनात भीतीही असते कारण कधी अवकाळीचा फेरा येईल आणि कधी होत्याचे नव्हते होईल अशी मनात धास्ती निर्माण होते.**

बहुतेकदा ही धास्ती खरी ठरते आणि चेहऱ्यावरच्या हास्याचे अश्रूत रूपांतर होते. मागील काही वर्षांपासून हेच चित्र राज्यात पाहायला मिळत आहे. यावर्षीही तेच झाले मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने बळीराजाच्या हातचा घास हिरावून घेतला. उभे पीक क्षणात आडवे झाले. क्षणात होत्याचे नव्हते झाले. अवकाळी पाऊस आणि गारपिटीने उभ्या पिकाची नासाडी झाली. उभ्या पिकाची नासाडी झाल्याने बळीराजा हवालदिल झाला. कांदा, गहू, द्राक्षे, डाळिंब, मोसंबी, सफरचंद, केळी, कोथिंबीर, हरभरा आणि पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणत नुकसान झाले. ऐन सुगीच्या काळात आसमामी संकटाने बळीराजाच्या डोळ्यात अश्रू आणले. वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडल्याने शेतकरी हवालदील झाला. अवकाळी पावसाने हवालदिल झालेल्या बळीराजाला या संकटातून सावरण्याची जबाबदारी सरकारची आहे. सरकारने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले याबद्दल सरकारचे आभार मानावे लागतील मात्र पंचनामा हा सोपस्कार ठरू नये ही अपेक्षा कारण दरवेळी पंचनामा होतो पण नियमांच्या कचाट्यात बळीराजाला अडकवले जाते त्यामुळे नुकसान भरपाई मिळण्यास अनके अडचणी निर्माण होतात. सरकारने बळीराजाच्या हिताचा विचार करून तातडीने पावले उचलायला हवीत. शेती करण्यासाठी बळीराजा सोसायटी, बँक किंवा खाजगी सावकाराकडून कर्ज काढूतात. वेळीच कर्ज फेडले नाही तर कर्जाचा डोंगर उभा राहतो. हे कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडतो. हे कर्ज जर फेडता आले नाही तर बळीराजाला आत्महत्येशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे राज्यात आत्महत्येचे सत्र सुरू होते. राज्यात शेतकरी आत्महत्येचे सत्र पुन्हा सुरू होऊ द्यायचे नसेल तर सरकारने बळीराजाला तातडीने नुकसानभरपाई द्यावी. वास्तविक दरवर्षी हेच चित्र पाहायला मिळते. गेल्या पाच दहा वर्षांपासून तापमान बदलामुळे कधी कमी तर कधी अधिक तापमान असते. काहीवेळा गारपीट, मुसळधार पाऊस, यामुळे पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असते. पारंपरिक पीक यावेळेस नुकसान करत नाही. मात्र दूरदृष्टीने शेती केल्यास अशा अचानक आलेल्या संकटांवर मात करता येऊ शकते. हवामान बदल, तापमानवाढ, अलनिनो यासारख्या गोष्टींमुळे यापुढे असे आसमामी संकट नेहमीच येणार आहे. त्यामुळे बळीराजाने आपली पीक पद्धती बदलणे गरजेचे आहे. निसर्गात मानवाने अवास्तव ढवळाढवळ केली आहे त्यामुळे यापुढे निसर्ग देखील आपले रौद्ररूप दाखवणारच आहे त्यामुळे निसर्गाच्या नावाने खडे फोडण्यापेक्षा येणाऱ्या संकटांवर कशी मात करता येईल याचा विचार बळीराजाने करावा. शेतकरी, शासन, प्रशासन आणि कृषी संशोधक यांनी याबाबत गांभीर्याने विचार करावा.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५



# वात्सल्यमूर्ती, त्यागपूर्ण जीवनाची कहाणी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**जन्म आणि मृत्यू या दोन बिंदुंमधील अंतर म्हणजे आयुष्य. आपण कोठे आणि कुणाच्या पोटी जन्म घ्यावा, हे आपण ठरवू शकत नाही पण मिळालेलं आयुष्य सार्थकी कसे लावावे , जीवन कसे जगावे, हे नक्कीच आपल्या हातात असते. मानवी देह हा नश्वर आहे, पण त्या व्यक्तीने निर्माण केलेल्या आठवणीं ह्या चिरंतन राहतात. स्मरणशक्ती ही मानवाला लाभलेली दैवी देणगी आहे. जीवनातील अनेक घटना, प्रसंग, सुख- दुःखाच्या आठवणीमध्ये माणूस रमत असतो. या स्मरणशक्तिमुळेच माणूस भूतकाळात रमत जातो आणि त्यात अडकत जातो. प्रत्येकाच्या आयुष्यात आईचं स्थान हे महत्त्वपूर्ण आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा , आईविना भिकारी' असे म्हटले जाते.**

आईशिवाय जीवनाची कल्पना सुद्धा करायला मन धजत नाही. हो ना! आईच्यानंतर मुलांवर माया करणारी स्त्री म्हणजे आईची बहीण मावशी. आपल्या मुलांप्रमाणे आपल्या बहिणीच्या मुलांवर भरभरून माया करते, प्रेम देते. आईवर अनेक काव्य रचली गेली. पुस्तके लिहिली गेली. 'श्यामची आई' हे पुस्तक सर्वश्रुतच आहे. अनेक लेखक, कवींनी आपल्या लेखणीतून आईची विविध रुपं अधोरेखित केली आहेत. पण मावशीवर असे काही लेखन वाचनात आलेले स्मरत नाही. अपवादही असू शकतात.

लेखक सुनील पांडे यांनी आपल्या आईस्वरूप मावशीच्या आठवणींना शब्दरूप देऊन पुस्तकरुपात तिच्या स्मृती जपण्याचा प्रयत्न केला आहे. 'माय ही जगो नि मावशीही जगो' ही कादंबरी तारा मावशीच्या खड़तर आयुष्याची साक्ष देणारी आहे. अनेकदा असे होते, घरातील स्त्रीचे जगणं , तिचा त्याग हा दुर्लक्षित राहतो. पण तिच्या त्या त्यागामुळे कुटुंबाचं जगणं सुकर होत असतं, याची जाणीव करुन देणारी ही कादंबरी आहे. ओघवती आणि प्रवाही लेखनशैली, प्रथमपुरुषी निवेदनशैली, वर्तमानकाळ ते भूतकाळ - वर्तमानकाळ अशा फ़्लैश बैक तंत्राचा अगदी सुयोग्य वापर लेखकाने केलेला आहे. हे पुस्तक लिहिताना लेखकाची मनःस्थिती काय असेल याची कल्पना करणं ही कठीण. कारण ज्या मावशीने आपल्यावर एवढी माया केली, तिच्या आजारपणात घेतलेली तिची भेट , त्या आठवणी अचानक तिच्या निधनानंतर लिहिताना लेखकाच्या संवेदनशील मनाचा बांध नक्कीच फुटला असणार. ज्या व्यक्तीवर आपण जीव लावतो, त्या व्यक्तीचं आपल्या जीवनातून अचानक निघून जाणं , याची कल्पनाही मनाला करता येत नाही. वास्तव स्विकारता येत नाही. पण सत्य स्विकारुन आपलं आयुष्य प्रवाही ठेवावे लागते, हेच खरे.

कादंबरीच्या सुरुवातीलाच तारा मावशीच्या निधनाची बातमी संवादातून समजते आणि मन विषण्ण होते. दिवाळीचे आनंदाचे दिवस. भाऊबीज आणि पाडवा हे सण साजरे करून तारा मावशी सगळ्यांना प्रेम देऊन आपल्या पुढील प्रवासाला निघून जाते आणि घरातील सगळे या अचानक आलेल्या प्रसंगाने शोकसागरात बुडून जातात. अंत्यविधी ते दशक्रियाविधी या कालावधीत लेखकाने तारा मावशीच्या आठवणींना शब्दबद्ध केल्या आहेत. पुस्तकाच्या प्रत्येक पानावर दिलेले मावशी आणि मायचं रेखाचित्र आठवणींचं मोहोळ उठवतं. या कादंबरीतून तारा मावशींचा एकूणच जीवनप्रवास लेखकाने मांडला आहे. पुस्तकातील विविध प्रसंगातून तारा मावशीची प्रचंड इच्छाशक्ती, सकारात्मक दृष्टिकोन, प्रेमळ, मायाळू, सगळ्यांवर माया करणारी अशी ही तारा मावशी खरेच मोठ्या मनाच्या होत्या. लग्नानंतर स्वतःला मूल नाही म्हणून पतीला दुसरे लग्न करण्यास सांगून एकाच घरात आपल्या सवतीसोबत सुखाने संसार केला. आपल्या सवतीच्या मुलांवर पोटच्या मुलांप्रमाणे जीव लावला. या प्रसंगातून तारा मावशीमधील वात्सल्यमुर्ती , तिचे मातृत्व पदोपदी जाणवतं. आपल्या सवतीसोबत करणं ही अशक्य गोष्ट पण तारा मावशी सवतीसोबत बहिणीप्रमाणे राहिल्या. त्या दोघींमधील आपलेपणा, सहज स्वीकार वृत्ती आणि निर्मळ मन यामुळे त्यांचे फुलत गेलेले नाते वाचायला हवे.

मावशीचं सततचं आजारपण, शरीर कृष झालेलं, काही वर्षापूर्वी जीवघेण्या अपघातांमुळे हाताला झालेली खोल जखम . हे सगळे घाव ती धीटपणे सोसत राहिली. मध्येच ह्रदयविकाराच्या त्रासामुळे गोळ्या - औषधे सुरु होती. वीस वर्षे ह्या गोळ्या सुरु होत्या. इतके आघात होऊनही तारा मावशी आपल्या प्रचंड इच्छाशक्तीमुळे, सकारात्मकतेमुळे जीवन जगल्या. कधीही मनात निराशा आणू दिली नाही. सोशिक वृत्तिने जगत राहिली आणि इतरांना प्रेम देत राहिली.




तारा मावशीच्या अचानक जाण्याने सगळ्यांच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली. लेखकाने आपल्या मनातील भाव नेमकेपणाने कुठेही वाहवत न जाता मांडल्या आहेत. ही कादंबरी म्हणजे तारा मावशीला वाहिलेली खरी शब्दसुमनांजली आहे. आपल्याकडे एक म्हण आहे, 'माय मरो नि मावशी जगो' पण लेखक म्हणतात की, 'मायही जगो नि मावशीही जगो'. हे म्हणण्यामागे लेखकाची नेमकी भावना काय आहे, हे जाणून घेण्यासाठी ही कादंबरी वाचायला हवी!

**( मायही जगो नि मावशीही जगो -कादंबरी / लेखक :सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन /मूल्य : १८० रुपये )**

# कन्नडच्या शेतकऱ्यांचे कांद्याने केले वांधे..!



## कांदे जनावरांसमोर फेकण्याची वेळ : पिकावर केलेला खर्चही निघेना

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यात विविध ठीकानाच्या शेतकऱ्यांणी साठवून ठेवलेले कांदे आखेर सडुन तसेच सोडून देन्याची वेळ आली आहे ,मात्र अद्यप भाव नसल्यामुळे. या वेळी शेतकऱ्यांना दुष्काळात तेरावा महिण्याचा सामना करावा लागत आहे तर काही-काही संतप्त शेतकऱ्यांनी भरलेल्या चाळी मध्ये बेवारस पने कांदे सोडून दिल्याचे चित्र पहावयास मिळत आहे, जैतखेड़ा-हिवरखेड़ा रोड वर वसलेले गांव वडाळी येथील संतप्त शेतकऱ्यांनी असे कांदे फेकून दिले आहे . शेतकऱ्यांनी उधार उसनवार करुण कांद्याची लागवड केली होती शीतकर्यांनी मोठ्या आशेने जास्त क्षेत्रात कांद्याची लागवड केलि. त्यांच्या आशेच्या हाती फ़क्त निराशाच हाती आली या परिसरातील शेतकऱ्यांनी कांद्यावर जास्त भर दिला होता त्यावर लागवड पासून ते काढ़नी पर्यंत चांगलाच खर्च केला. या परिसरात मजुराची भयंकर टंचाई असून दुसऱ्या गावातील मजूर बोलवून कामे अटपूण घेतली मात्र कांद्याला मुद्दल भाव ही नसल्याने अश्या वेळी शेतकऱ्यांच्या बोलने आइकवायस मिळत आहे की या वर्षी केले शेतकर्यान्चे कांद्याने वांधे गेल्या वर्षी पासून दुष्काळाचे सावट होते शेतकऱ्यांनी जेम-तेम करुण थिंबक सिंचनाच्या आधारावर कांद्याची पेरणी केली होती. कांद्याला लावणी पासून ते काढनी पर्यन्त लहान मुला सारखे जीव ही लावले रात्र दिवस कष्ट महेनत करुण इतकी मेहनत घेऊन शेतकऱ्यांच्या पद्रात फ़क्त निराशा पडल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे,पिशोर,वासडी,भिलदरी,कोळबी,भारंबा भारंबा तांडा,साळेगांव,माळेगांव ठोकळ, जैतखेड़ा, गंधेश्वर,गोरळमळी,वडाळी,हिवरखेड़ा, चिखलठाण,भोकनगांव,दाभाडी, बहिरगांव, हतनूर, चापानेर,जैतापूर, आलापुर,चापानेर, औराळा आदि गावात जास्त क्षेत्रात कांद्याची लागवड करण्यात आली आहे. कांदे काढणीनंतर त्याला साठवणुकीसाठी लोखंडी पिंजरे बनवायस चांगलेच खर्च करुण काद्याचे भाव वाढेल या आशेने साथवणुक केलि मात्र भाव वाढले नाही आणि त्यातील कांदे सडायला सुरवात झाली.शेतकऱ्यांनी एकडून तिकडून आलेले पैसे या मध्ये गुंतवणुक केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे सध्या स्थितीत किरकोळ बाजारात कांदे सहा रूपये किलो दराने व होलसेल बाजारात अवघ्या चार रूपये किलो दराने मिळत आहे त्यामुळे ग्राहकांचा चांगलाच फायदा होत आहे यात शेतकरी वर्गा वर कांदा उखड्यावर फेकण्याची वेळ आली आहे गेल्या वर्षी लागवडीत घट होती तर भाव चांगले होते मात्र यावेळी उत्पन्न चांगले आहे तर भावात घट आहे या परिसरात जास्त क्षेत्रात कांद्याची साथवणुक असून भाव नाही. कांदा लागवड केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान दया अशी मागणी शेतकरी वर्ग करीत आहे.

# ट्रॅक्टर पलटी होऊन युवकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** किडेबिसरी, ता. सांगोला येथे शेतात सरी सोडताना बांधावरून ट्रॅक्टर पलटी होऊन, ट्रॅक्टरखाली सापडून २१ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १२ फेब्रुवारी रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याप्रकरणी दिनांक १५ मार्च रोजी दत्तु बाबुराव कोळेकर यांनी सांगोला पोलीसात फिर्याद दिली आहे. बाबुराव दत्तु कोळेकर ( वय २१ ) रा. किडेबिसरी ता. सांगोला असे ट्रॅक्टर पलटी होऊन मरण पावलेल्या युवकाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १८ फेब्रुवारी रोजी फिर्यादी व मुलगा बाबुराव आणि इतरजण राहत्या घराच्या पाठीमागील शेतामध्ये ट्रॅक्टरने सरी सोडण्याचे काम करत होते. फिर्यादी यांचा मुलगा बाबुराव हा ट्रॅक्टरने सरी सोडत होता. दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास शेताच्या बांधालगत सरी सोडत असताना अचानक ट्रॅक्टर बांधावरुन पलटी झाला. त्यावेळी बाबुराव हा ट्रॅक्टरच्या खाली अडकला व ट्रॅक्टर पलटी झाल्याने चारही टायर वरती झाले होते.

त्यावेळी फिर्यादी व इतर लोकांनी ट्रॅक्टर उचलून सरळ करुन बाबुराव यास ट्रॅक्टरच्या खालून बाहेर काढले. त्यावेळी बाबुराव याच्या डोकीस, मानेस व छातीस मार लागला होता व तोंडातुन व नाकातून रक्त येत होते व तो बेशुध्द होता.त्यास उपचाराकरिता मिरज येथे घेऊन गेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापुर्वी मयत झाला असल्याचे सांगितले. त्यानंतर बाबुराव याचे प्रेत घरी आणून फिर्यादी यांनी धर्माप्रमाणे त्याचा अंत्यविधि केला. सांगोला पोलीस बाबुराव याच्या मयताच्या चौकशीकामी घटनास्थळी आल्याने शेवटी फिर्यादी यांनी बाबुराव कोळेकर याच्या विरोधात अविचाराने , भरधाव चालवून ट्रॅक्टर पलटी करून स्वतःच्या मरणास कारणीभूत झाला म्हणून तक्रार दिली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे.



# नारायणगिरी महाराजांचे अध्यात्मासह स्वातंत्र्य लढ्यातही मोलाचे योगदान

## महंत रामगिरी महाराज : श्री क्षेत्र गोदावरी धाम सराला बेटाचे ब्रह्मलीन नारायणगिरी महाराजांची चौदावी पुण्यतिथी उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पवार**

**महालगाव :** संताचे जीवन परोपकारासाठी असते. संत तुकाराम, संत एकनाथ, रविदास, गाडगे बाबा, ज्ञानेश्वर, जनाबाई, मुक्ताबाई आदी. संताचे जीवन संघर्षात गेले ,सामाजिक कार्य करतांना त्यांनी कधीच लोकनिंदा व स्वार्थ बघितला नाही मनुष्याने कितीही विद्या प्राप्त केली तरी संता शिवाय प्रसन्नता मिळत नाही, सदगुरु ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांचे जीवन ही मानवी हितासाठी व बेटाच्या उत्कर्षासाठी संघर्षात गेले निजामाच्या जोखाडातुन मराठवाड्याला मुक्त्ती देण्यासाठी ब्रह्मलीन नारायण गिरीजी महाराज यांनी स्वातंत्र्य लढ्यातील योगदान हे खूप मोठे असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र गोदाधाम सराला बेटावर आज योगिराज गंगागिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांच्या 14 व्या पुण्यतिथी उत्सवात आयोजित किर्तन प्रसंगी "झाली संध्या संध्येय, माझा गेला आत्माराम ह्रदयी प्रगटला" संत एकनाथ महाराज यांच्या अभंग रचनेचे विवेचन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज याना बालपणापासुन अध्यात्माची आवड होती . संतांनी सद बुद्धी रुपी आसनावर विजय मिळवला मनुष्य स्वतःला जोपर्यंत ओळखत नाही तोपर्यंत त्याचा परमार्थ संपत नाही समाधानी संताजवळ असते किती पैसा कमावला तरी मानवाला शांती मिळणार नाही शांती मिळायचे असेल तर सद्गुरुला शरण जावे लागते,अनेक महापुरुषाच्या जीवनात संघर्ष होता .सदगुरुनी संघर्ष करुन बेटाची व्याप्ती वाढवली.संकट ही एक संधी असते,जीवनात संकटात जो मात करतो तोच यशस्वी होतो.संकटे ही जीवंत माणसाकडेच येत असतात मेलेल्या कडे नाही.नारायणगिरी महाराज हे बेटाला व समाजाला मिळालेले एक रत्न होते औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर झाल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे गंगागिरीजी महाराज भक्त परिवारातर्फे आभार मानले धर्मवीर संभाजी महाराज यांनी स्वताच्या धर्माचे पालन करूण धर्मासाठी बलीदान दिले दुसऱ्यांच्या धर्माचा आदर केला. तरूणानी संभाजी महाराज यांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेवला तर समाजामध्ये बंधुभाव एकात्मता निर्माण होईल असे महाराज म्हणाले. यावेळी किर्तनानंतर येवला,नांदगाव ,कोपरगाव, वैजापूर, गंगापुर तालुक्यातील शेकडो गावातुन आलेल्या पुरणपोळ्या,मांडे , दुध संघाचे यांच्या वतीने पाच हजार लीटर दुधाचा महाप्रसाद भाविकांना वाटण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत वैजापूरच्या नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगर अध्यक्ष साबेरभाई खान, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे, बाबासाहेब पा जगताप, मनाजी मिसाळ, संजय पा बोरणारे, पंकज ठोंबरे, संजय निकम, बंडू वाणी, भाऊसाहेब झिंजुर्डे, बाळासाहेब कापसे ,अंकुश हिंगे, कमलाकर कोते, राजेंद्र साळुंखे, संदीप शेठ पारख, दत्तू पा खपके, संदीपान महाराज, बाळासाहेब महाराज, रंजाळे, गोविंद महाराज मलिक, सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज आदींसह लाखो भाविकांची उपस्थिती होती.



# बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देणाऱ्या महिलेचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रेकॉर्डवरच्या मोटरसायकल चोराने अनैतिक संबंधातून महिलेचा गळा आवळून खून केल्या प्रकरणी गुन्हेशाखेने काल रात्री ११वा,( १४/०३ ) आरोपी पकडून छावणी पोलिसांच्या हवाली केला.

तुषार सुंदरलाल मेहरा रा.पदमपुरा असे आरोपीचे नाव आहे.तो सुशिक्षित असून आयटीआय झालेला आहे.तर कांता कचरु दाभाडे( ४६ ) रा.पेठेनगर असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. तुषारला काल रात्री १०वा. वेदांतनगर पोलिस ठाण्याजवळून पीएसआय कल्याण शेळके यांनी पकडले. गेल्या तीन वर्षापासून आरोपी तुषार हा कांतासोबत अनैतिक संबंध ठेवून होता.

मयत कांता तुषारला मानसिक त्रास देत असे. अंदाजे चार महिन्यापूर्वी गुन्हेशाखेचे पीएसआय अजित दगडखैर यांनी तुषारला मोटरसायकल चोरी प्रकरणात पकडले होते. त्यावेळी त्याच्या खिशात सुसाईड नोट मिळाली होती. आपण कांताच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करणार असा उल्लेख सुसाईड नोट मधे होता. त्यावेळी गुन्हेशाखेने त्याला आत्महत्या न करण्याबाबत समुपदेशन केले होते. हा सर्व घटनाक्रम पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांना माहित होता. मयत कांता ची ओळख पटल्यानंतर पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांनी हे काम तुषार मेहेरा नेच केल्याचा तर्क लढवंत त्याला पकडण्यासाठी पथक पाठवले.तुषार ला पकडताच त्याने खुनाची कबुली दिली. पेठेनगरातील नागरिकांच्या माहिती नुसार मयत कांता ही बाबा पेट्रोलपंप परिसरात देहविक्रय करत असे त्याच वेळेस आरोपी तुषार तिच्या संपर्कात आला.तुषार ला मयत कांता ने शरीरसुखाची सवय लावली. याचा गैरफायदा घेत तुषार ला कांता १लाख रु. दे नाहीतर बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवेल अशी धमकी देत होती. त्यामुळे चिडलेल्या तुषार ने कांताचा खून केल्याची कबुली पोलिसांना दिली. पोलिसांना दिलेल्या जबाबात त्याने सांगितले की, तो निर्व्यसनी आहे. पण कांताला दारुची सवय होती. याचा फायदा घेत तुषार ने कांताला ( १३/०३ ) रोजी संध्याकाळी गोगाबाबा टेकडी परिसरात नेले. तिथे भरपूर दारु पाजून तिचा स्कार्फ ने गळा आवळून खून केला व स्कार्फ नाल्यात फेकून दिला. व निघून गेला. वरील कारवाई पोलिस निरीक्षक अविनाश आघाव, यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कल्याण शेळके, पोलिस कर्मचारी विजय निकम,संजय गावंडे, राजेंद्र साळुंके, संजय मुळे यांनी पार पाडली.या प्रकरणी पुढील तपास पोलिस निरीक्षक कैलास देशमाने करत आहेत.

# वैजापुरात विविध विभागांचे शेकडो कर्मचारी बेमुदत संपावर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** 2005 नंतरच्या सर्व कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसाठी शिक्षक संवर्ग, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, ग्रामसेवक, लिपीकवर्गीय कर्मचारी, महसूल विभागाचे कर्मचारी, तसेच श्रेणी-ड चे कर्मचारी आदी विभागाचे दोन हजाराच्या पुढे कर्मचारी 14 मार्च 2023 पासून संपात सहभागी झाले आहेत.शासनाने तात्काळ जुनी पेन्शन व नवीन राष्ट्रीय पेन्शन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी राज्य स्तरीय समिती गठीत केली आहे. परंतु जोपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू होत नाही, तोपर्यंत संप मागे घेतला जाणार नाही, अशी भूमिका कर्मचारी समन्वय समितीने घेतली आहे. 14 मार्च 2023 पासून सुरु झालेल्या या संपामुळे आरोग्य व्यवस्था कोलमडली असून तालुक्यातील शाळा बंद आहेत तसेच अनेक कार्यालये यात पंचायत समिती, तहसिल, नगर परिषद, भूमि अभिलेख आदी कार्यालये ओस पडली आहेत. आज कर्मचारी समन्वय संघटनेच्या वतीने कालच्या शासननिर्णयाची होळी करून 'जुनी पेन्शन मिळालीच पाहिजे अशा घोषणा पंचायत समिती वैजापुर कार्यालयासमोर सर्व कर्मचाऱ्यांनी दिल्या तसेच यापुढील काळात संप अजून तीव्र स्वरूपात करण्याचा संकल्प सर्व कर्मचाऱ्यांनी केला. संप यशस्वी करण्यासाठी वैजापूरात वेगवेगळ्या विभागाच्या तालुका समित्या मेहनत घेत आहे.

# चार तोंड कशी भरवायची ? या चिंतेत झुरतोय शेतकरी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पूर्वी निसर्ग आणि बाजारपेठ कष्टकरी शेतकऱ्यांसाठी लाभदायी होत्या..काळ्या मातीत चार दाणे पेरल की खंडीभर धनधान्यानी लादनी भरायच्या..आता मात्र चित्र वेगळं असल्याने शेती व्यवसाय धोक्यात आला आहे..घरातील ऊतरंड्या रिकाम्या पडुन आहेत..लहरी निसर्ग आपल्याच तो-यात वावरत आहे तर बाजारपेठेत मालाला हमीभाव मिळत नाही..मागील अनेक वर्षांपासून श्रृतुमानाच कालचक्र उलटे फिरू लागले आहे..

यांचा मोठा फटका शेती व्यवसायाला बसल्याने शेतीच वाळवंट झालं आहे..चार तोंड कशी भरवायची याची चिंता सतावते आहे..जिवंतपणी अशा मरणकळा सोसवत नाहि रे देवा...अशी खंत हतबल झालेला शेतकरी व्यक्त करीत आहे. सगळ्यात उत्तम व्यवसाय म्हणून "शेती" ला प्रथम पसंती असायची त्यावेळी हा व्यवसाय अगदि भरभराटिचा होता. शेंद्रिय शेतीमूळे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असे नव्हे तर ते धान्य कसदार असल्याने आरोग्याच्या दृष्टिने लाभदायी होत. विज्ञान-तंत्रज्ञान दिवसेनदिवस प्रगतीकडे झेपावत असल्याने संगणकीय युगात "संकरीत" वाणाने एन्ट्री केली आणि जगमूठीत आलं



की पूर्वींच्या दिवसाच रूपच पालटून गेले.लोकसंख्या वाढल्याने महागाईने डोकवर काढल आहे. झटपट शेती. नवनविन तंत्रज्ञान पध्दतीने शेती सुरू झाली. संकरीत बियाणे, रासायनिक मिश्रीत खत,औषधीचां मारा सुरु झाला. खाणपाणाची चव बिघडली परीणामी विविध गंभीर आजारांनी जनतेला सळोकीपळो करून सोडलं आहे. दिवसागणीत पर्यावरणातील समतोल बिघडल्याने निसर्गाच्या हालचालीत मोठा बदल घडताना दिसतो आहे. वेळेत येणारा श्रुतु आता मनमानी करीत धुमाकूळ घालतो आहे.अवेळी पाऊस वादळ वारा, गारपीट यांचा तडाखा बसून लागला

**बाजारपेठेत शूकशूकाट :** मागील अनेक वर्षांपासून खरीप , रब्बी हंगामातील पीकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घटल्याने शेतकरी हतबल झाला आहे .श्रूतुचक्र आपली कुस बदलते आहे .बाजारपेठेत हमीभाव मिळत नाही .कापूस हे शेतक-याच सोनं म्हटलं जातं त्या कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने बहूतांश शेतकऱ्यांचा कापूस घरातच थप्पी लाऊन आहे . अवकाळी पाऊस पाठ सोडायला तयार नाही .घराचं पैशाची चणचण असल्याने संसारगाडा कसा हाकायचा या चिंतेत शेतकरी आहे . बाजारपेठेत मालाची आवक घटल्याने सर्वत्र शूकशूकाट दिसून येत आहे .

आहे.कष्टकरी शेतकरी काळ्याआईच्या भरवशावर वर्षभराची आखणी करून आपला उदरनिर्वाह चालवतो परंतु शेतक-यांच्या हिरव्यास्वप्नाचा चूराडा झाल्याने खरीप आणि रब्बी हंगामातील पीकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने ऊत्पादनात घट होत आहे. सरकार मायबाप आपआपसातच सत्तासंघर्षात मग्न झाल्याने शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेण्याकडे लक्ष देत नाही.केवळ आसवे पुसण्याचे काम करून पाठ थोपाटुन घेण्यात धन्यता मानत आहेत. निसर्ग मात्र कुण्या जन्माचा बदला घेत आहे हे कळायला मार्ग नाही.

# संपात सहभागी कर्मचाऱ्यांना नोटीसा देण्याची कार्यवाही सुरू!

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर :** जिंतूर सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा आज दुसरा दिवस यावर कार्यवाही म्हणून सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रशासनास संपकऱ्यांना कार्यवाही चे आदेश प्राप्त झाल्याची माहिती मिळाली आहे दरम्यान जिंतूर तालुक्यातील संपाचा आज दुसरा दिवस संपात सहभागी झाल्याचा दावा कर्मचारी संघटनांनी केला तर 727 कर्मचारी सहभागी झाले असे लेखी दिले आहे तर प्रत्यक्ष आंदोलनात मात्र मोजके कर्मचारी होते परंतु जे कर्मचारी कार्यालयीन वेळेत गैरहजर आहेत अशांना प्रशासनाच्या वतीने लवकरच नोटीस तामील करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आल्याची माहिती प्रसासना कडुन समजली दरम्यान नोटीस मध्ये संपात सहभागी होणे गैरवर्तणूक ठरविले जाईल असे म्हंटले आहे सदर नोटीस देण्यात येणाऱ्या पत्रात खालील प्रमाणे मजकूर आहे.




महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक संघटना 15 22 /प्र . क्र .36-अ/ दिनांक 13 . 03 . 2023अन्वे दिनांक 14 .03 .2023 पासून कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी बेमुदत संप आंदोलनाला आंदोलनासंदर्भात कारवाई करणे बाबत निर्देश आहेत . ज्या अर्थी आपण उपलब्ध संपामध्ये सामील आहात त्या अर्थी शासन कामगार सुरळीत रित्या पार पाडण्याच्या दृष्टीने आपणास सूचित करण्यात येते की संपामध्ये सहभागी होणे ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व आपणा विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपामध्ये केंद्र शासनाचे 'काम नाही वेतन नाही' हे धोरण राज्य शासनाने ही अनुसरले आहे संपामध्ये सहभागी झाल्यामुळे आपल्या सेवेमध्ये खंड पडू शकतो यांची आपण नोंद घ्यावी .

# दुसऱ्याच्या आनंदी जीवनाकडे सकारात्मकतेने पाहणे हेच खरे सुखी जीवनाचे रहस्य : डॉ. सचिन परब

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दुसऱ्याच्या सुखी, समाधानी व आनंदी जीवनाला सकारात्मकतेने पाहणे हेच खरे सुखी जीवनाचे रहस्य होय असे प्रतिपादन महाराष्ट्र सरकारचा महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार विजेते मुंबईचे मनोविकार तज्ञ डॉ. सचिन परब यांनी बुधवार( ता,१५ )रोजी येथील सूरज लॉन्स मध्ये केले. येथील प्रजापिता ब्रह्माकुमारीज

ईश्वरिय विद्यालय द्वारे आयोजित "सुखी जीवन का रहस्य"या विषयावर ते बोलत होते, ते पुढे म्हणाले की,मनुष्य आपल्या जीवनात सदैव नकारात्मक विचारांच्या गाठी निर्माण करीत असतो, मस्तिष्कमध्ये निर्माण झालेल्या या गाठी पुढे, पुढे हृदयाच्या रक्त वाहिन्यात सरकत जातात व हृदय रोग, रक्तदाब, मधुमेह सारखे आजार शरीरात निर्माण होतात व दुःखी जगण्याला आरंभ होतो. यासाठी आपल्या मनातील नकारात्मकता समूळ काढून टाका, दुसऱ्याचे भले चिंता, मनातील तेढ, दुर्गुण, वाईटपणा यांचे समूळ उच्चटन करा, सुख तुमच्याकडे आपोआप धावत येईल असेही डॉ. परब पुढे म्हणाले "ठेविले अनंते तैसेची रहावे ,चित्ती असू द्यावे समाधानी" परमेश्वराने जसे ठेवले तसेच रहाणे, अधिकची लालसा न करणे हे ही सुखी जीवनाचे रहस्य आहे, असे ही डॉ. परब म्हणाले, या कार्यक्रमाचे उदघाटन नगराध्यक्ष सौ. शिल्पाताई परदेशी यांनी केले, छत्रपती संभाजीनगरच्या प्रजापिता ब्रह्माकुमारीज विद्यालयाच्या प्रमुख बी.के. शीला दीदी,वैजापूर केंद्राच्या कमल दीदी, संजय पा. निकम, धोंडीरामसिंह राजपूत, डॉ.व्ही.जी. शिंदे, ॲड. आर.डी. थोट, ॲड.चंदने, विष्णू जेजुरकर, प्रेमसिंह राजपूत, राजू जोगीलाल राजपूत, लिमेश वाणी, विजय शिंगर, कराळे भाई,जोगीलाल राजपूत, अशोक धसे मुकुंद दाभाडे,यांच्या सह ग्रामीण भागातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# हाडोळी अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट

## माधव अमृतवाड यांनी केली चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** हाडोळी, (ता.भोकर) हे गाव तालूक्यातील" स्मार्ट व्हिलेज" म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे.नुकतेच राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव करण्यात आला आहे.तेथील ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी अथक परिश्रमातुंन हे यश मिळवल आहे. अशा गावातील अंगणवाडी बांधकामात हलक्या प्रतीचे साहित्य वापरून थातुरमातुर काम उरकण्यात आले आहे.अंगणवाडीतील सौच्छालयाची घाण शोषखड्डा न करताच चक्क गटारीत सोडल्याने बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या कामाची त्वरीत चौकशी करण्याची मागणी भोकर तालुका सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष माधव अमृतवाड यांनी केली आहे.

येथील उपअभियंता बांधकाम विभागास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तालुक्यातील अनेक गावात स्मार्ट व्हिलेज ची कामे करण्यात आली आहेत. ग्रामपंचायत आणि विविध सेवाभावी संस्था, ग्रामस्थांनी स्वंयस्फुर्तीनी सहभाग घेतला आहे.त्याचे फलीत म्हणून हाडोळी ग्रामपंचायतला राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव करण्यात आला आहे.गावात अनेक लोकाभिमुख विधायक विकासकामाना प्राधान्य देण्यात आले आहे.स्वच्छतेकडुन समृध्दिकडे झेपावणा-या गावचा आदर्श घेत तालुक्यातील अनेक गावात स्मार्ट व्हिलेज ची कामे होत आहेत हे तालूक्यासाठी भुषणावह आहे.हाडोळीतील रहिवासी तथा सरपंच यांचे पती व सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव अमृतवाड यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेऊन गावचा कायापालट करण्याचा संकल्प केला.यावेळी विविध सामाजिक संस्था, अधिकारी, कर्मचारी,




हाडोळी गावचा कायापालट झाला असून त्याची कीर्ती दिल्ली दरबारी पोहोचली आहे .पण येथील लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी यांनी गावात अद्याप ग्रामपंचायत कार्यालयासाठी स्वतंत्र ईमारत उभारणीसाठी कसलीच कार्यवाही केली नाही हि बाब खेदाची आहे .एका आदर्श गावातील हा प्रकार अशोभनीय आहे .माजी मूख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या मतदारसंघात असा प्रकार होतो तर इतर ठिकाणी काय असे दबक्या आवाजात बोलल्या जात आहे .याची दखल घेऊन संबधीतानी त्वरीत ईमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी जोर धरते आहे .

ग्रामस्थांनी एकसंध होऊन गाव आदर्श केल आहे. अशा गावातील अंगणवाडी हि आदर्श असावी म्हणून जिल्हा वार्षिक नियोजनातून सन २०२० ( साडेआठ लाख रुपये ) मंजूर केल्याने अंगणवाडी बांधकाम करण्यात आले आहे. यावेळी संबंधित कंत्राटदार आणि अधिका-यांनी संगणमत करून हलक्या प्रतीचे साहित्य वापरून थातुरमातुर काम उरकले आहे . याशिवाय अंगणवाडीतील सौच्छालयासाठी स्वतंत्र शोषखड्डा उभारणे गरजेचे होते पण तेथील घाण चक्क गटारीत उघड्यावर सोडण्यात आली आहे.परिणामी बालक व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकामाची त्वरीत चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव अमृतवाड यांनी केली आहे.याची अद्याप वरिष्ठांनी दखल घेतली नाही कंत्राटदारांना अभय देणा-या अधिका-यांची चौकशी करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा श्री.अमृतवाड यांनी दिली आहे.

# करखेलीच्या देशी दारू दुकानाच्या त्रासातून सुटका होणार ?

## उपजिल्हाधिकाऱ्यांनी दिले चौकशीचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असणाऱ्या करखेली गावातील देशी दारू दुकान नेहमीच वादग्रस्त राहिलेले आहे. भाजपचे किसान आघाडीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताभाऊ शेंबाळे यांनी करखेली गावातील देशी दुकानाबाबत मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली होती, वरिष्ठ स्तरावर ह्या तक्रारीची गंभीर दखल घेत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे पत्र उपजिल्हाधिकारी यांना प्राप्त झाले असून उपजिल्हाधिकाऱ्यांनी उत्पादन शुल्क विभाग, उपविभागीय अधिकारी व धर्माबादच्या तहसीलदारांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

दत्ता शेंबाळे यांनी दिलेल्या तक्रारीत असा आरोप केला की, सदर देशी दारू दुकानाला ज्या अकृषक भागात परवानगी दिली आहे. त्याठिकाणी ते दुकान नाही त्यामुळे करखेली वासियांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, ज्या ठिकाणी हे दुकान आता चालू आहे,हा भाग भरगच्च रहिवासी भाग असून त्या भागात बँक, मंदिरे असून त्या ठिकाणी येजा करणाऱ्या नागरिकांसह माताबहिणींना नाहक तळीरामांचा त्रास सहन करावा लागतो.त्यामुळे हे दुकान शासन दरबारी ज्या ठिकाणी नोंद आहे, तेथेच त्याचे स्थलांतर करावे, अशी मागणी शेंबाळे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन देत मागणी केली होती, यांची गंभीर दखल निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय यांनी घेतली असून उपविभागीय अधिकारी व धर्माबादच्या तहसीलदारांनी सदर दारू भट्टीच्या ठिकाणाचा अकृषक ( वाणिज्य ) परवाना आहे का ? या भट्टी संदर्भात लोकांच्या काय अडचणी आहेत ? सदर परवानाची जागा बदलता येईल का ? या संदर्भात स्वंयस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत दि. 1 मार्च रोजी निघालेले पत्र अजूनसुद्धा तहसीलदार कार्यालयात आले नसल्याची बाब तहसीलदार शिंदे ह्यांनी मान्य केले आहेत, पत्र आले कि योग्य ती चौकशी केल्या जाईल असे सुद्धा तहसीलदार महोदयांनी सांगितले आहे. 1 मार्च रोजी नांदेडहून निघालेले पत्र चे अजून सुद्धा धर्माबाद येथील कार्यालयात आलेच नाही कि पत्र येवून सुद्धा तहसीलदार यांच्याकडे ते पत्र गेले नाही ? ह्याबाबत सुद्धा शंका व्यक्त होत आहे. या पत्रात उत्पादन शुल्क विभागाला ही फटकारले असून, परवाना दिलेल्या तारखेपासून जमीन वापरा संबंधाने अकृषिक ( वाणिज्य ) परवाण्याची तपासणी केली का ? तसेच तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमकी काय कारवाई केली आहे ? याचा ही अहवाल पंधरा दिवसात मागविले आहे. सदर दारू दुकानातून या परिसरातील खेड्यामध्ये मोठ्या प्रमाणात दारू तस्करी होते. यामुळे शासनाचा शुल्क बुडते आणि लोकांच्या संसाराची राखरांगोळी होते.

# नगरपरिषद कार्यालयातच महिलांना मारहाण

## नियमानुसार बांधकाम करण्यास सांगणाऱ्या मुख्याधिकारी, कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ धक्काबुक्की

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** घरकुलाच्या बांधकामाचा वाद थेट हाणामारी पर्यंत पोहोचला असून येथील कुंभारवाडा परिसरात सुरू असलेल्या घरकुल बांधकामावरून दोन कुटुंबीयांमध्ये जोरदार हाणामारी झाली यामध्ये तक्रार करणाऱ्या महिलांवर हल्ला करत त्यांना जबर मारहाण करण्यात आली तर नियमानुसार बांधकाम करण्यास सांगणाऱ्या नगर परिषदेच्या मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ करत धक्काबुक्की करण्यात आली याप्रकरणी तीन जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे शहरातील कुंभारवाडा येथे वाकळे कुटुंबीयांचे घरकुल योजने अंतर्गत बांधकाम सुरू असून या बांधकामाविषयी मीराबाई सुखदेव वाकळे यांनी तक्रार नोंदविली होती यावरून नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम दराडे स्थापत्य अभियंता



पंकज पवार यांनी कुंभारवाडा येथील बांधकामाच्याठिकाणी भेट देऊन वाकळे कुटुंब यांना नियमानुसार बांधकाम करण्याची समज दिली होती. याचा राग मनात धरून दगडू राजाराम वाकळे यांनी सोमवार रोजी नगरपरिषद कार्यालयात येऊन तक्रारदार मीराबाई सुखदेव वाकळे व उषा जालिंदर जाधव यांना जबर मारहाण केली तसेच नियमानुसार बांधकाम करण्यास सांगणारे मुख्याधिकारी विक्रम दराडे व स्थापत्य अभियंता पंकज पवार यांना शिवीगाळ करत त्यांनाही धक्काबुक्की केली. या प्रकरणी विक्रम दराडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून दगडू राजाराम वाकळे राजू दगडू वाकळे व नवनाथ राजाराम वाकळे या तिघांवर स्थानिक गुन्हे शाखेकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. मारहाणीचा व्हिडिओ नगर परिषदेच्या काही कर्मचाऱ्यांनी काढला होता तो समाज माध्यमांवर आज दिवसभर फिरत होता.

# मार्च एंडच्या धास्तीला, अवकाळी वातावरणांची जोड

## आभाळच फाटलं तर ठिगळ लावणार कुठं, बळीराजाची फरफट

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात सध्या काळजाचे ठोके चुकविणारे शब्द कानी ऐकायला मिळत आहे. ते म्हणजे आम्ही मोठ्या मेहनतीने कबाड कष्ट करून तोंडाजवळ आलेला घास निसर्गाच्या अवकाळीपणांमुळे फेकला गेला आहे. त्यामुळे आता आभाळ जर फाटले तर ठिगाळं लावणार कोठे? हे नुकसान ग्रस्त बळीराजांच्या तोंडातले शब्द ऐकून अनेक मने हेलावून निघत आहे.

सध्या रब्बी हंगाम मध्यावर आला असतांना गहु,हरभरा पिके जोमात तर अवकाळी पावसाने बळीराजा कोमात ! ही स्थिती सध्या दिंडोरी तालुक्यातील शेतकरी वर्गाची बनली आहे. अगोदरच शेतात पिकवलेल्या शेतीमालाला कवडी मोल भाव , द्राक्षे पिकांची परवड यागोष्टीमुळे पुर्णतः खचलेला शेतकरी बांधव आर्थिक कोंडीच्या चक्रव्यूहातून बाहेर पडत नसल्याने आता निसर्गाच्या लहरीपणाच्या अवकृपेचा बळीचा बकरा बनला आहे.

मागील तीन ते चार वर्षांपासून तालुक्यातील शेतकरी वर्गाला कोणी वालीच राहिला नसल्याने शेतात पिकवलेला नगदी भाजीपाला, कांदा, द्राक्षे पिकांच्या भावाच्या बाबतीत वाऱ्यावरची वरात झाली आहे. जगाचा पोशिंदा असणारा बळीराजा शेती करण्यासाठी व पिके तयार करण्यासाठी विविध प्रकारच्या बँक, पतसंस्था, हातउसानवार कर्ज घेऊन आपल्या काळी आईची पिके उभे करण्याच्या रूपाने सेवा करीत असतो. परंतु वर्षांमागुन वर्ष येत जाते. परंतु शेतकरी वर्ग आर्थिक कोंडीच्या सापळ्यातुन बाहेर पडतांना दिसत नाही. त्यामुळे शेती करतांना आता शेती व्यवसाय म्हणजे बळीराजांला एकप्रकारे डोक्यावर टांगती तलवार वाटतं आहे. मागील काही दिवसांपूर्वी हवामान खात्यांच्या अंदाजानुसार अवकाळी पावसांचे वातावरण तयार झाले. व दोन ते तीन दिवस अवकाळी पावसांचे आगमन झाले. व जोमात आलेल्या पिकांना यामुळे मोठा झटका बसला. आता या संकटातून कसाबसा शेतकरी सावरत असताना



परत एकदा हवामान विभागांने अवकाळी पावसांच्या आगमनांचे भाकित व्यक्त केल्याने व ते भाकित शंभर टक्के खरे ठरल्याने सध्या अवकाळी पावसांचे आगमन झाले आहे.त्यामुळे ऐन सोंगणीसाठी गहू आडवे पडले आहे. व हरभरा व भाजीपाला पिकांची या अवकाळी पावसाने पुर्णपणे वाट लागली आहे. तर अजून दिंडोरी तालुक्यातील द्राक्षे पंढरी द्राक्षे पिके हे जवळजवळ ५० टक्के खुडण्याचे बाकी आहे. त्यामुळे अवकाळी वातावरण निर्माण झाल्याने शेतकरी पुर्णपणे बेचिराख झाला आहे. आता शेती भांडवलासाठी घेतलेले विविध ठिकाणचे कर्ज कसे फेडायचे व आता मार्च एंडच्या धास्तीने सावरायचे कसे ?या विवेचनेत सध्या तालुक्यातील बळीराजा दिसत आहे.

अवकाळी वातावरणांची आंबा पिकांवरही संक्रांत मागील काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसाचा व वातावरणांचा असंख्य पिकांना फटका बसल्यानंतर आता परत अवकाळी वातावरण तयार झाल्याने सध्या आंबा पिकांला मोठा मोहर व फळधारणा झाली असतांना आता जोराचे वारे ,पाऊस यामुळे आंबा फळांच्या झाडांचा मोहर व फळ खाली पडत आहे . त्यामुळे शेती व्यवसायांला जोड म्हणून आंबा नेहमी चांगली साथ देत असतो . परंतु यंदाच्या या अवकाळी पावसामुळे व वातावरणांमुळे आंबा पिकांवर एकप्रकारे संक्रांत निर्माण झाली आहे .

**योगराज रौंदळे ( पुणेगाव ता .दिंडोरी**



# सरकारच्या विरोधातील संपकऱ्यांचे आंदोलन तहसील प्रांगणातच!

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** सामान्य आंदोलकांना मोर्चेकऱ्यान तहसील आवाराच्या बाहेर तर आंदोलक संपकरी आत कसे असा प्रश्न जिंतूर येथे उपस्थित झाला असून सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा आज तिसरा दिवस होता गेल्या दोन दिवसापासून तहसील कार्यालयाच्या प्रांगणातच कर्मचाऱ्यांनी ठाण मांडले असून सर्वसामान्य नागरिकांना अंदोलनासाठी मात्र आत येऊ दिले जात नाही. सामान्यांना एक तर कर्मचाऱ्यांना एक न्याय कसा असा प्रश्न सर्व सामान्यात विचारला जात आहे.

जिंतूर तालुक्यातील सुमारे 727 कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतला असून या संपाच्या आज तिसऱ्या दिवशी तहसील कार्यालय परिसरात पाहणी केली असता कर्मचाऱ्यापेक्षा त्यांची वाहन असलेल्या मोटरसायकली मोठ्या प्रमाणात दिसून आल्या तर तहसील कार्यालयाच्या प्रांगणामध्ये कर्मचाऱ्यांचा आंदोलन खुलेआमपणे सुरू असल्याचे चित्र जिंतूर तहसील प्रांगणात दिसून आले आहे. एरवी सर्व सामान्य जनतेला अथवा नागरिकांना आंदोलन करायचा असेल मोर्चा उपोषण करायचा असेल तर तहसील कार्यालयाच्या गेट बाहेरच अडवल्या जाते त्यांना बाहेरच आपले आंदोलन करा आत जाऊ दिले जात नाही तर अनेक वेळा कडक पोलीस बंदोबस्त ही त्या ठिकाणी ठेवल्या जातो परंतु शासनाच्या विरोधात बेकायदेशीरपणे चालत असलेल्या या आंदोलनाचे ठिकाण मात्र तहसील कार्यालयाचे प्रांगन कसे ? असा खोचक सवाल सर्वसामान्य नागरिक उघडपणे करताना दिसून येत आहेत. याबाबत तहसील कार्यालय येथे तहसीलदार यांना आंदोलकांनी प्रांगणामध्येच आंदोलन करत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता त्यांनी कार्यवाही बाबत वरिष्ठानकडून मार्गदर्शन घेतले जाईल असे म्हटले आहे. तहसीलदार काय कार्यवाही करतील या कडे सर्व सामान्यांचे लक्ष लागले आहे.

# राज्यातील कलावंतांना हक्काचे मानधन विना विलंब द्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील भारतीय प्राचीन कला, साहित्य, संगीत, नृत्य, शाहीरी, तबला वादक, हार्मोनियम वादक गायक इत्यादी क्षेत्रातील जे कलावंत वृद्ध झालेले आहेत, ज्यांनी भारतीय कला जोपासण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचलेले आहे, अशा कलावंताना वृद्धापकाळात उदर निर्वाह साठी शासन थोडे फार मानधन देते ज्यातून त्यांचा उदर निर्वाह होतो. सदरील प्रकरण राज्यातील पंचायत समिती मार्फत जि.प.च्या समाज कल्याण विभागातून मार्गी लागतात मात्र पंचायत समिती व जि.प.सुध्दा अशी प्रकरण मार्गी लावण्यात टाळाटाळ करते असेच प्रकरण वैजापूर प.स.मार्फत गेल्या १५वर्षांपासून प्रलंबित आहे. येथील जेष्ठ कलावंत तबला वादक फकिरराव विनायकराव विश्वासू हे २००९पासून मानधन मिळावे



म्हणून सारखे प्रयत्न करीत आहेत,सर्व कागद पत्रांची पूर्तता करूनही गेल्या पंधरा वर्षापासून त्यांना कलावंतांचे मानधन नाही म्हणून येथील सेवा निवृत्त जवान गौतम अशोक गायकवाड व समाजकार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी दि.१६/३/२३ गुरुवार रोजी उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी( प्रांत अधिकारी ) माणिकजी आहेर यांना विश्वासू यांच्या वतीने निवेदन देऊन संबंधितास लोक कलांवत मानधन मिळावे म्हणून विनंती केली, प्रांत अधिकारी माणिकजी आहेर यांनी तात्काळ दखल घेत छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मीना यांना पत्र देऊन लोककलावंत मानधन अर्ज मंजूर करून नियमाप्रमाणे मानधन मंजूर करावे असे कळविले, संबंधित कलावंत विश्वासू यांनाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटण्याची सूचना केली,सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपुत यांनी शासनाकडे लोक कलावन्त यांची प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्याची मागणी केली आहे.



# डॉ. गणेश डोईफोडे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** येथील कोरोना काळात आपले जीव धोक्यात घालून चांगले कार्य केल्याने लोकमत तर्फे आयोजित गौरव कर्तृत्वाचा या कार्यक्रमात फुलंब्री येथील डोईफोडे हॉस्पिटल चे संचालक आणि अजिंठा येथील ग्रामीण रुग्णालया चे वैद्यकीय अधिकारी तसेच माझे मार्गदर्शक मुसद्दी राजकारणी वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती आणि माझे परममित्र विदर्भाचे भूमिपुत्र आदरणीय श्री डॉक्टर गणेश जी डोईफोडे सर यांचा केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड साहेब, लोकमतचे एडिटरइन चीफ राजेंद्र बाबुजी दर्डा,संपादक नंदकिशोर पाटील साहेब ,जाहिरात व्यवस्थापक अक्षय साहूजी साहेब यांच्या हस्ते दि.१२ मार्च रोजी सह पत्नी सत्कार करण्यात आला. त्यांनी कोरोना काळामध्ये स्वतःच्या जीवाची व कुटुंबाची परवा न करता स्वतःला समाजकार्यात आणि वैद्यकीय क्षेत्रात झोकून दिले आणि फुलंब्री व सिल्लोड तालुक्यातील सर्व रुग्णांसाठी तत्पर असे सेवा दिली त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जिंतूरात कर्मचाऱ्यांच्या संपास अल्पप्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** राज्यभरातील सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी सुरू केलेला संपाचा आज दुसरा दिवस होता दुसऱ्या दिवशी येथील तहसील कार्यालय समोरच्या मंडपात भेट दिली असता तेथील मंडपात शुकशुकाट होता तर अनेकांनी पहिल्या दिवशी फक्त चमकोगिरी केली.

दरम्यान जिंतूरात कर्मचारी संपास अल्पप्रतिसाद तर नागरीकात तीव्र प्रतिक्रीया उमटल्या आहेत. जिंतर येथे संपाचे हत्यार उपसल्या नंतर पहिल्याच दिवशी अंदोलनासाठी गर्दी केली मात्र आज दुसऱ्या दिवशी जिंतूरच्या तहसील कार्यालयासमोरील कर्मचाऱ्यांच्या वतीने टाकलेला मंडप अगदी मोकळाच होता आणि संपाबाबत किती गांभीरता आहे. याचं हे ताजं उदाहरण जिंतूर मध्ये दीसुन आले सर्व तालुक्यातील सरकारी कर्मचारी हे संपात सहभागी असले तरी नगरपरिषदेच्या माध्यमातून काम करणारी कायमस्वरूपी सरकारी मंडळी उपस्थित दिसून आली नाही . मात्र जिंतूर नगर परिषदेत कंत्राट पद्धतीने लावलेल्या शेकडो कंत्राटी रोजंदारी कर्मचाऱ्यांनी सुद्धा आपल्या कामावर दांडी मारल्याची दिसून आले. जिंतूर शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग काही ठिकाणी नाल्यातूंबल्याचे दिसून येत आहे एकंदर संपात सुद्धा कुणाचा पायपोस कुणाला नाही अशीच काहीशी स्थिती जिंतूर तालुक्यात दिसून येत आहे. नागरिकांतून मात्र या संपाबाबत तीव्र प्रतिक्रिया असून भरमसाठ पगार घेऊनही परत पेन्शन साठी हट्ट का ? व पेन्शन नाही मिळणार या अटीवर नोकरी स्वीकारली असतानाही परत पेन्शन मिळण्यासाठी अट्टहास का ? आणि त्यासाठी संप पुकारून जनतेच्या भावनांशी खेळण्याचा हा प्रकार अतिशय चुकीचा असल्याचे मत अनेकांनी उघडपणे व्यक्त केले आहे. एकंदर जिंतूर तालुक्यात संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांकडून संपात पाठ फिरवल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

**कर्मचारी संघटनेचा उपस्थिती बाबत दावा**

वरील संपाबाबत कर्मचारी संघटनेने संपासाठी 727 लोक असल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात संख्या अपुरी दिसून आली . कर्मचाऱ्यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात 21 संघटना सहभागी झाल्याचे सांगण्यात आले असून या संपामध्ये सहकारी, नीम सरकारी, शिक्षक व शिक्षक कर्मचारी संघटना ,आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, कृषी विभाग, पंचायत विभाग, लेखा विभाग, बांधकाम विभाग, कल्याण विभाग, सामान्य शिक्षण संस्था त्याचबरोबर जिल्हा परिषद सर्व विभागांच्या विभाग अंतर्गत सर्व संघटनांचे सर्वच कर्मचारी दिनांक 14 मार्च पासून बेमुदत संपात असल्याचा दावाही त्यांनीप्रसीध्दिस दीलेल्या पत्रकात म्हटले आहे . पत्रकावर इंगोले, डी .एस . चाटे अदिच्यासह्या आहेत .



# कृषी उत्पन्न बाजार समिती भाजपकडून लढणार : माजी सभापती प्रकाश घुले

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीचे वारे वाहु लागल्याने बेलखेडा, सोनवाडी, नागद तांडा येथे भाजपाचा कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड निवडणूक संदर्भात संपर्क दौरा करण्यात आला. या दौऱ्यामध्ये भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, भाजपचे जिल्हा सचिव संजय गव्हाणे, भाजपाचे जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, पंचायत समिति माजी उपसभापती काकासाहेब तायडे ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश अण्णा घुले ,मा सभापती पंचायत समिती उत्तमराव राठोड यांची प्रमुख उपस्थीती होती. यावेळी संजय खंबायते यांनी आपल्या भाषणात म्हणाले की कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ही भारतीय जनता पार्टी कन्नड तालुक्याच्या वतीने संपूर्ण ताकतीने लढवणार असून सर्वसामावेशक उमेदवार या निवडणुकीत भाजपा उतरवणार आहे.

भाजपा जिल्हा परीषद किशोर पवार आपल्या भाषणात म्हणाले की सभापती प्रकाश घुले यांच्या कार्यकाळात विकास कामाचा धडाका कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रकाश घुले यांच्या रूपाने केला व सात बाजार उप समित्या मान्यता देऊन त्या व्यवस्थित रित्या चालवल्या व शेतकऱ्यांना दोन पैसे देऊन त्याचा नफा वाढवण्याचे काम भाजपाच्या संचालक बोर्ड म्हणून मी बारीक लक्ष ठेवुन त्या ठिकाणी चांगल्या कामास पाठिंबा दिला असे त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

तसेच सभापती प्रकाश आबा घुले कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी आपल्या भाषणात म्हणाले की मी जेव्हा पदभार स्वीकारला त्यावेळेला कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड येथे खात्यामध्ये फक्त पन्नास हजार रुपये शिल्लक असताना कामकाज सुरू केले. त्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीचा कन्नड तालुक्यातील व्याप वाढवण्यासाठी खूप असोशियन प्रयत्न केले त्यात सात उपबाजार समिती सुरुवात करण्यात आली त्यामध्ये औराळा, चापानेर, देवगाव, चिकलठाण, करंजखेड, चिंचोलीस अनेक ठिकाणी मान्यता देऊन त्या यशस्वीरित्या चालवण्याचे काम माझ्या कार्यकाळात झालं. मला वेळ कमी मिळाला पण येणाऱ्या काळामध्ये मतदारांनी जर संधी दिली तर पिशोर, नाचनवेल आणि नागद या बाजार उप समित्या तयार करून त्या कार्यरत करण्याचे काम येणाऱ्या काळात मी करणार आहे तसेच मी येणारी कृषी उत्पन्न बाजार समिती भाजप पक्षाकडून लढणार असाही ठाम निर्णय घेतला.

यावेळी भगवान ठाकरे, माजी पंचायत समिती सदस्य गप्पूदादा राठोड, रमेश नागरे, कल्याण जंजाळ, भाजपाचे तालुका सचिव संजय चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य कुंजीलाल चव्हाण, साहेबराव राठोड, बाजीराव पवार, गोरख पवार , संभाजी पवार, बबलू पाटील, समाधान पाटील तसेच भाजप कार्यकत्यांची उपस्थीती होती.

# वादळी वाऱ्याने नुकसान झालेल्या भागाचे त्वरित पंचनामे करून अर्थसहाय्य करा

## खा. चिखलीकरांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**दत्ता गोजेगावकर**

**मुखेड :** नांदेड तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक भाग आज



दुपारी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले तर काही भागात गारांसह पाऊस झाला यामुळे अनेक नागरिकांच्या घरावरचे टीनशेड उडाले तर शेतकऱ्यांच्या झोपड्यांचेही मोठे नुकसान झाले. उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत वादळी वाऱ्यामुळे फटका बसलेल्या सर्व भागांचे त्वरित पंचनाने करावेत आणि आर्थिक मदत करावी अशी मागणी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

आज दिनांक 16 मार्च रोजी दुपारी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे नांदेड तालुक्यातील काकांडी, लोहा तालुक्यातील मारतळा, नायगाव तालुक्यातील काहळा, कृष्णुर, अर्धापूर तालुक्यातील बारड ,लहान, देगाव , पिंपळगाव यासह जिल्ह्यातील अनेक भागात मोठे नुकसान झाले आहे. अनेकांच्या घराचे नुकसान झाले आहे. शेतीतील उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे. केळीच्या बागांना फटका बसला आहे . गव्हाच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत नुकसानग्रस्तांना तातडीची मदत मिळवून देण्याचे अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्यासाठी आदेशित करावे आणि शेतकऱ्यांना व नुकसानग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत करावी अशी मागणी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली आहे. यासाठी आपण राज्य आणि केंद्र सरकारशीही लवकरच बोलणार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून अधिक मदतीसाठी प्रयत्न करू अशी माहिती ही खा. चिखलीकर यांनी दिली आहे.

# कॉपीचे प्रकार न थांबल्यास राज्याचे वाटोळे होईल : अजित पवार

## सरकारने गांभीर्याने याविरोधात कडक भूमिका घ्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अहमदनगर जिल्ह्यातील टाकळी-मानुर ( ता. पाथर्डी ) येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींना कॉपी पुरवणाऱ्या



जमावाकडून लाठ्याकाठ्या घेऊन भरारी पथकावर दगडफेक करण्यात आली आहे. ते परीक्षा केंद्रच ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही बाब अत्यंत गंभीर आहे. गेल्या काही दिवसापासून राज्यात असे कॉपीचे आणि पेपर फुटीचे प्रकार वारंवार घडत आहेत. हे प्रकार न थांबल्यास राज्याचे वाटोळे होईल अशी भीती व्यक्त करत सरकारने गांभीर्याने या विरोधात कडक भूमिका घेण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली.

बुधवार, दिनांक १५ मार्च रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास टाकळी-मानुरी ( ता. पाथर्डी ) येथे दहावीचा भूमिताचा पेपर सुरु होता. त्यावेळी परीक्षार्थींना कॉपी पुरवणाऱ्या जमावाने परीक्षा केंद्रात जबरदस्ती प्रवेश करत भरारी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकावून कॉपी पुरवण्यास मुभा देण्याची मागणी केली होती. अधिकाऱ्यांनी याला नकार देताच जमावाने त्यांच्यावर हल्ला केला शिवाय दगडफेक केली. पाथर्डीतील या घटनेबरोबरच जालन्यात परीक्षेदरम्यान जिल्हा परिषद शाळा, सेवली या केंद्रावर आमच्या पाल्यांना कॉपी करू द्या अन्यथा तुम्हाला जीवे मारू अशा धमक्याच केंद्रसंचालक व पर्यवेक्षकांना देण्यात आली आहे. गेल्या काही दिवसापासून राज्यात दहावी-बारावीच्या परीक्षेच्यावेळी सामुहिक कॉपी, पेपरफुटीसारखे प्रकार वारंवार घडत आहेत. असे प्रकार घडल्यास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय होणार आहे. राज्याची शैक्षणिक क्षेत्रात पिछेहाट होऊन राज्याचे वाटोळे होईल. तरी या प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेऊन या विरोधात कडक भूमिका घ्यावी अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

# स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रा.सोनाली पाटील यांना व्ही.जे.टी.आय.मधून पीएच.डी.

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** गोपाळपूर ( ता. पंढरपूर ) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित 'कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग' च्या सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील प्रा.सोनाली पांडुरंग पाटील यांना मुंबई विद्यापीठातील वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजीकल इन्स्टिटयुट, तथा व्हीजेटीआय माटुंगा येथून 'डेव्हलपमेंट/ इम्पृव्हमेंट इन वॉटर फिचींग एड टू एज द बर्डन ऑफ रुरल उमन इन इंडिया' या विषयामधून पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांना डॉ. के. के. सांगळे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

प्रा.सोनाली पाटील यांना पीएच. डी. च्या काळात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. प्रशांत पवार यांच्यासह स्वेरीतील इतर प्राध्यापक व सहकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. 'डॉ. सोनाली पाटील या स्वेरीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरिंग विभागात गेल्या १० वर्षांपासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी ०६ रिसर्च पेपर्स सादर केले आहेत तसेच त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून १० रिसर्च पेपर्स देखील प्रकाशित झाले आहेत. पीएच.डी. प्राप्त केल्याबद्धल संस्थेतर्फे वेणूनगर, गुरसाळे येथील श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन आणि संस्थेच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे यांच्या हस्ते स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, प्रा.संजय मोरे, कु.पूजा रोंगे, प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे यांच्या उपस्थितीत डॉ.सोनाली पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. सोनाली पाटील म्हणाल्या की, 'मला मिळालेल्या या यशाचे प्रथम श्रेय मी स्वेरीला देते. स्वेरी मध्ये उच्च शिक्षणासाठी दिले जाणारे प्रोत्साहन व सर्वांचे सहकार्य यामुळे मला हे पीएच. डी.चे यश प्राप्त झाले आहे.' पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतिश मांडवे यांच्यासह, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी डॉ.सोनाली पाटील यांचे अभिनंदन केले.

# अपेक्षेपेक्षा कमी दर; शेतकऱ्यांचा हिरमोड

**वाशीम:** रब्बीच्या हंगामातील गहू, हरभरा बाजार समित्यांमध्ये विक्रीस येत आहे. चांगला दर मिळेल या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांना अपेक्षेपेक्षा कमी दर मिळत असल्याने त्यांचा हिरमोड होत आहे. आज वाशीमच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अंदाजे तीन हजार क्विंटल गव्हाची आवक झाली आहे. बाजारात नवीन गव्हाला १९०० पासून २००० ते २२०० रुपये दर मिळत आहे. गव्हापेक्षा ज्वारीला जवळपास ३००० रुपयाचे दर मिळत आहे.

यावर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या पिकांना काही प्रमाणात नुकसान सहन करावे लागल्याने शेतकऱ्यांनी रब्बीच्या हंगामात गहू आणि हरभरा पिकाची लागवड केली. शेतकऱ्यांनी नवा गहू काढल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्रीस दाखल होताच काही दिवस चांगला दर मिळाला होता. परंतु सद्यस्थितीत गव्हाचे दर वाढतील या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग होत आहे. वाशीमच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये दररोज तीन ते साडेतीन हजार क्विंटल गव्हाची आवक होत आहे. सध्या गव्हाला १८०० पासून २००० पर्यत भाव मिळत आहे. जिल्ह्यात लोकवन या गव्हाच्या वाणाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यापाठोपाठ नर्मदा सागर, २४९६, २१८९, अजित या वाणाची पेरणी असते. बाजार समित्यांमध्ये वाण विचारात न घेता सरसकट गव्हाची एकाच दराने खरेदी होत असल्याने शेतकरीवर्गात नाराजीचा सूर उमटत आहे. तसेच खासगी बाजारामध्ये गहू महाग तर कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये मात्र कमी दर मिळत नसल्याने शेतकरीवर्गात चिंतेचे वातावरण आहे.

# मागील वर्ष ठरले रा. स्व. संघाच्या कार्यविस्ताराचे सकारात्मक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मागील वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने कार्यविस्ताराचे सकारात्मक वर्ष होते. येत्या दोन वर्षात पश्चिम महाराष्ट्र प्रांतात अधिक जोमाने कामाचे नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक प्रा. सुरेश (नाना) जाधव यांनी दिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा १२ ते १४ मार्च २०२३ दरम्यान समलखा (पानिपत) येथे झाली. प्रतिनिधी सभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील सद्य स्थितीची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी रा.स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी उपस्थित होते.

रा. स्व. संघाचे येत्या काळात सामाजिक परिवर्तनाच्या पाच आयामांमधील आपल्या कार्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे नियोजन आहे. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी आचरण आणि नागरिक कर्तव्य हे ते पाच आयाम आहेत. समाजहितैषी लोकांना सोबत घेवून समरसतेसाठी निरंतर प्रयत्न करणे, हे या कार्य योजनेचे उद्दिष्ट आहे. अस्पृश्यता समाजासाठी कलंक असून तो मिटविण्यासाठी संघ कटिबद्ध असल्याचे प्रा. जाधव यांनी आवर्जून सांगितले.

प्रा. जाधव म्हणाले की, पानिपत येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेयजी होसबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण प्रतिनिधी सभेमध्ये देशभरातून ३४ संघटनांचे १ हजार ४७४ प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी संघाच्या कार्यस्थितीवर विस्ताराने चर्चा करण्यात आली. यावेळी देण्यात आलेल्या माहितीनुसार, सद्यस्थितीत देशभरात ४२ हजार ६१३ स्थानी ६८ हजार ६५१ शाखा सुरू आहेत. मागील वर्षी याच काळात ३७ हजार ९०३ स्थानी ६० हजार ११७ शाखा होत्या. मागील वर्षीच्या तुलनेत संघ शाखांमध्ये सुमारे आठ हजारांनी वाढ झालेली आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत देशभरात एकूण ३ हजार ६८५ एवढे संघ शिक्षा वर्ग पार पडले. रा.स्व. संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी यावेळी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्र प्रांतात २८ प्राथमिक वर्ग झाले. त्यात प्रांत स्तराचा एक - प्रथम वर्ष वर्ग व एक - द्वितीय वर्ष वर्ग आणि देशभरातील स्वयंसेवकांचा एकत्रित तृतीय वर्ष झाले. या विविध वर्गांमधून पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील सहभागी स्वयंसेवकांची संख्या ३,३४१ एवढी आहे. पश्चिम महाराष्ट्र प्रांतात २६५ स्थानी ६८३ शाखा आहेत. प्रांतात पुणे, नाशिक आणि कोल्हापूर असे तीन विभाग असून १९२ विद्यार्थी शाखा, महाविद्यालयीन २३ शाखा, १२७ तरूण व्यवसायी व प्रौढांच्या १६९ शाखा आहेत. पुणे महानगरात ४९ नगर स्थानी २७२ शाखा आहेत. यामध्ये १११ शाखा बालांच्या, ४ महाविद्यालयीन तरूणांच्या ११५ विद्यार्थी तर ५४ तरूण व्यवसायी आणि १०३ प्रौढांच्या शाखा आहेत.

प्रांतात साप्ताहिक मिलनांची संख्या शहरी भागात ३७९ आणि ग्रामीण भागात १८२ अशी एकूण ५६१ एवढी आहे. सेवा कार्यांच्या संदर्भाने पश्चिम महाराष्ट्र प्रांतात एकूण १ हजार ७२३ सेवा वस्ती आहेत. सेवा वस्तीतच शाखा सुरू आहेत, अशा शाखा युक्त सेवा वस्तींची संख्या ६४ आहे. संघ स्वयंसेवकांच्या वतीने नित्य सेवा कार्य सुरू आहेत, अशा सेवाकार्ययुक्त ३४५ वस्ती असल्याचेही डॉ. दबडघाव यांनी सांगितले.

तसेच शाखांनी आपापल्या परिसराचे सामाजिक अध्ययन करून तिथे परिवर्तनाला गती द्यायला हवी आणि अशा सामाजिक परिवर्तनात सामाजिक समरसता, परिवार प्रबोधन आणि पर्यावरण संरक्षण या गतिविधी कार्यरत आहेत, असेही डॉ. दबडघाव म्हणाले. उपभोगवादी जीवनशैलीत पर्यावरणाचा ऱ्हास वाचविण्यासाठी अधिक अपरिग्रह संकल्पना आचरणात आणली पाहिजे. अहिंसेचे पालन करायला हवे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा असा विश्वास आहे, की या प्रवासात समकालीन युगाला या मार्गावर पुढे जाण्यासाठी वर्धमान महावीर यांच्या शिकवणुकीची गरज आहे. हे वर्ष भगवान महावीर यांच्या दोन हजार पाचशे पन्नासाव्या (२५५०) वे निर्वाण वर्ष आहे. या पार्श्वभूमीवर देशभर त्यांच्या विचार प्रसाराच्या कार्यक्रमात स्वयंसेवक योगदान देणार आहेत.

संघर्षाच्या काळात परकीय शासनापासून मुक्ती मिळविण्यासाठी ज्या प्रकारे त्याग आणि बलिदानाची आवश्यकता होती, त्याच प्रकारे वर्तमान काळात हे लक्ष्य गाठण्यासाठी नागरिक कर्तव्यांप्रती कटिबद्ध तसेच वसाहतवादी मानसिकतेपासून मुक्त समाजजीवनसुद्धा घडवावे लागेल. या संदर्भात मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी केलेल्या 'पंच-प्रणा'चे आवाहन महत्त्वाचे आहे.




**शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त विविध कार्यक्रम :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त आणि भगवान महावीर यांच्या २५५० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रा. स्व. संघाच्यावतीने विविध उपक्रम आयोजिले आहेत. समाजाला शेकडो वर्षांच्या दास्यत्वाच्या मानसिकतेतून मुक्त करून समाजात आत्मविश्वास व आत्मगौरवाची भावना जागी करणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीला त्यांचा राज्याभिषेक झाला आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यंदा हिंदवी स्वराज्य स्थापनेचे ३५०वे वर्ष सुरू होत आहे. महाराष्ट्रासह देशभरात यानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीने चालक त्रस्त



आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ताः खुलताबाद) येथील मुख्य बाजारपेठेतून जाणाऱ्या औरंगाबाद, फुलंब्री बाजार, सावंगी, कन्नड, पिशोर, नागापूर या अंतर्गत जिल्हा मार्गावर वाहतुकीची कोंडी वारंवार होत असल्याने वाहनांचालकासह रस्त्यावरील दुकानदार व व्यावसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते अपघाताच्या भीतीसह वेळेचा मोठा खो कळंबा होतो.

गावातील रस्ता दवाखाना कॉलनी एकता नगर ते ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत बाजारपेठ विस्तारित असून एक किलोमीटरच्या या मार्गावर व्यावसायिकांची दुकाने असून 35 गावांशी हे गाव संलग्न असल्याने बाजारपेठेतील व्यवहार व रहदारी होत असते.

अनेक वाहने दुचाकी चार चाकी सह रस्त्यावरच उभी केल्याने रहदारीचा अधिकाधिकखोळबा होतो. आठवडे बाजाराच्या दिवशी तर अधिक रहदारीचा व्यक्त य होऊन रस्ता पार करण्यास अधिक चा वेळ लागतो वाहनांचे कर्कश हॉर्नच्या आवाजांनी परिसर गजबजतो व गोंधळ होतो. मध्यंतरी ग्रामपंचायतच्या वतीने व पोलीस प्रशासनाने लक्ष दिल्यावरून काही अंशी रहदारीत सुधारणा झाली होती त्यानंतर पुन्हा दुर्लक्ष झाल्याने पुन्हा ही स्थिती होत आहे यासंबंधी प्रशासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे व कार्यवाही करण्याची गरज वाहनधारक व व्यावसायिकांची मागणी आहे.

# रविवारी पुण्यात आठवा नास्तिक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यात रविवारी (दि.19 मार्च) आठव्या नास्तिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, शहीद भगतसिंग विचार मंचच्या वतीनं देण्यात आली. नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशन मध्ये सकाळी 10 ते 1 या वेळेत हा मेळावा होणार आहे. ज्येष्ठ विज्ञानलेखक व स्त्रीरोग तज्ञ डॉ.शंतनु अभ्यंकर हे "न नास्तिकतेचा" या विषयावर तर स्तंभलेखक, रेडिओ जॅकी संग्राम खोपडे हे "नास्तिक दिन आयेंगे" या विषयावर बोलणार आहेत. तर "हो आम्ही आहोत नास्तिक" आणि "परमेश्वरावर मात" या दोन पुस्तकांचे प्रकाशन ही मेळाव्यात करण्यात येणार आहे. या मेळाव्याला महाराष्ट्रातील 27 जिल्ह्यातील व्यक्तींनी नोंदणी केली आहे.




शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in